**व्यवसाय / धंधा**

**अभिषेक मार्केटिंग येथे होलसेल** भावात बेकरीचे माल मिळेल. १० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड, बनपाव, क्रिमबन, क्रीमरोल ७.५० रु. २० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ६ नग कपकेक, बिस्किट, ब्रेड, क्रिमबन १५ रु. मिळेल. ३० रु विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड २२.५० पैसे. ४० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी ३० रु मिळेल. तुळजापूर वेस, गोल तालीम जवळ, सोलापूर.

**मो: ९४२२६५११०१**



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com



**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**

दारू... अंमली पदार्थ... गॅरंटेड सुटण्यासाठी...

व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..

(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)

**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**

फोन: 9552619752

कॉल/व्हॉटस्‌ॲप करा... दारू... अंमली पदार्थ... राम राम करा...

501% रिझल्ट



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २५४ वा | बुधवार, दि. २१ मे २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# ‘एका भ्रष्ट मंत्र्याच्या जागी दुसरा भ्रष्ट मंत्री, जनता अशीच भरडली जाणार’ - अंजली दमानिया

## छगन भुजबळही भाजपच्या वॉशिंग मशीनमध्ये धुऊन स्वच्छ झाले, हर्षवर्धन सपकाळ यांचा टोला

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्याच्या राजकारणात एक महत्त्वाची घडामोड घडली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांचा मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला आहे. राजभवनावर राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या उपस्थितीत छगन भुजबळ यांचा शपथविधी पार पडला.

यानंतर आता राजकीय वतुर्ळातून प्रतिक्रिया उमटत असून, भुजबळांच्या शपथविधीवरून विरोधकांनी महायुतीवर टीका केली आहे.

सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी एक्सवर एक पोस्ट करत संतप्त प्रतिक्रिया दिली. अंजली दमानिया आपल्या पोस्टमध्ये म्हणतात की, वाह फडणवीस वाह ! म्हणजे एका भ्रष्ट मंत्र्याच्या जागी दुसरा भ्रष्ट मंत्री येणार? जनता अशीच भरडली जाणार? की हा माज्यासारख्या भ्रष्टाचार विरोधी लढणाऱ्यांना संदेश आहे, की तुम्ही आमच काहीच वाकड करू शकत नाही? असा काय नाईलाज आहे?



की सभ्य माणसे मिळत नाहीत राजकारणात? अशी विचारणा अंजली दमानिया यांनी केली आहे.

**किळस वाटतेय महाराष्ट्राच्या राजकारणाची**

आणि हो, हेच भुजबळ जेव्हा जेलमध्ये होते, तेव्हा एक अगदी बिचाऱ्यासारखा फोटो माध्यमांमध्ये दाखवला जायचा. तेव्हा छातीत कळ यायची. मग आता ठणठणीत? किळस वाटतेय महाराष्ट्राच्या राजकारणाची खालच्या घोषणा आठवतात? "भ्रष्टाचारीयो पर कारवाई के लिए, अब की बार ४०० पार", "भ्रष्टाचार के खिलाफ मोदी सरकार के बडे कदम", हा आहे का तो बडा कदम? ही ती कारवाई? असा सवाल दमानिया यांनी उपस्थित केला आहे.

दरम्यान, १९९१ पासून विविध विभागांचा मंत्री बनत आलेलो आहे. मुख्यमंत्री जे खाते देतील, ते सांभाळीन. गृहमंत्रालयापासून ते सगळे काही सांभाळले आहे. मला कोणतीही जबाबदारी दिली तरी चालेल. हा मुख्यमंत्र्यांचा विशेषाधिकार आहे, अशी प्रतिक्रिया छगन भुजबळ यांनी मंत्रिपदाची शपथ घेतल्यावर दिली. (पान 2 वर..)

# लाडकी बहिण योजना चालविताना सत्ताधाऱ्यांची तारांबळ

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** लाडकी बहिण योजनेच्या लोकप्रीयतेवर सध्याचे महायुतीचे शासन सत्तारूढ झाले असले तरी ही योजना चालविण्यासाठीचा निधी उभारताना मात्र राज्य सरकारची तारांबळ उडत आहे.



लाडकी बहीण योजनेसाठी सामाजिक न्याय आणि आदिवासी विभागाचा निधी घेण्यात आला आहे. या योजनेसाठी सामाजिक न्याय विभागाचे ४०० कोटी रुपये घेतले गेल्याने मंत्री संजय शिरसाट चांगलेच संतापलेत. त्यांनी तोंडचा दांडपट्टा चालवण्यास सुरुवात केली आहे. त्यांनी सरकारलाच घरचा आहेर देण्यास सुरुवात केली आहे. 'आमचे पाय छाटायचे अन आम्हाला पळायला सांगायचे, हा कुठला न्याय?" अशी जळजळीत प्रतिक्रिया त्यांनी दिली. निधी देणार नसतील तर हा विभागाच बंद करण्याची मागणी त्यांनी केली. मुळात त्यांच्या खात्याचा पैसा मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी वर्ग केल्यानंतर ही योजना राबविणाऱ्या महिला आणि बालकल्याण विभागाचा शासनाच्या १०० दिवसांचा कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमात पहिला क्रमांक आल्याने शिरसाट अत्यंत संतप्त झाले आहेत. आमच्याच पैशाने अन्य विभाग पहिला क्रमांक मिळवतो ही गोष्ट त्यांना सहनच झालेली नाही. महाविकास आघाडी काळातही अर्थमंत्री अजित पवार यांनी कसा अन्याय केला, याचा पुन्हा एकदा पाढा वाचला. त्यामुळे निधीपेक्षाही अजित पवार हेच शिंदे गटाचे मूळ दुखणे असल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात सुरू आहे. शिरसाट यांनी दोन दिवस आदळआपट केली तरीही मुख्यमंत्र्यांनी यावर काहीही प्रतिक्रिया दिलेली नाही. अजित पवार यांना मुख्यमंत्री आणि भाजपचा पाठिंबा असल्याचेच एक प्रकारे मानले जात आहे. त्यामुळे शिरसाट यांची मात्र चांगलीच कोंडी झाल्याचे पाहायला मिळत आहे. समाजकल्याण खात्याचा निधी लाडकी बहीण योजनेसाठी वळविण्यापूर्वी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांची बैठक झाली. यात आदिवासी भागातील महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ देताना आदिवासी विकास विभागाचा निधी वापरावा, तसेच अनुसूचित जाती आणि जमातीच्या महिलांना या योजनेचा लाभ देण्यासाठी समाज कल्याणविभागाचा निधी वर्ग करावा, असे चचेअंती ठरविण्यात आले.

मुख्यमंत्री माझी लाकडी बहीण योजनेमुळे राज्याच्या तिजोरीवरील आलेला भार कमी करण्यासाठी परिवहन विभागाला २०२५-२६ मध्ये महसुलाचे उद्दिष्ट अडीच हजार कोटींनी वाढवून १७ हजार कोटींपर्यंत केले आहे.

प्रत्येक तालुक्यातील पथकास दरमहा २० ते ५० लाखांचा महसूल तथा दंड वसूल करण्याचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. त्यात दंडात्मक कारवाईवर भर देण्याच्या वरिष्ठांच्या सूचना आहेत.

परिवहन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून महसुलाचे उद्दिष्ट १०० टक्के पूर्ण करण्याच्या सूचना केल्या आहेत. त्यानुसार वाहनांचा कर, वाहन नोंदणी आणि दंड वसुली अशा तीन प्रमुख बाबींवर आरटीओ अधिकाऱ्यांनी फोकस केला आहे.

सोलापूर आरटीओकडे सहा तर अकलूज आरटीओकडे चार पथके आहेत. प्रत्येक पथकास दरमहा २० लाखांपर्यंत दंड वसूल करण्याचे उद्दिष्ट देण्यात आले असून. त्यानुसार जड वाहने, प्रवासी वाहने, परजिल्ह्यातील, परराज्यातील वाहनांवर कारवाई केली जात आहे.परिवहन विभागाला २०२५-२६ या आर्थिक वषार्साठी १७ हजार कोटींच्या महसुलाचे उद्दिष्ट आहे. यामुळे शासकीय खात्यांच्या महसुल वसुलीवर लाडकी बहिण योजनेचा भार असल्याचे दीसून येत आहे.

# नॉर्थकोर्ट मैदानावर शिवभक्तांची शिव-शंभो गर्जना



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती संभाजी महाराज जयंती आणि संभाजी आरमार संघटनेच्या १७ व्या वर्धापन दिनानिमित्त नॉर्थकोर्ट मैदान येथे शिव-शंभू गर्जना या फोक मराठी कॉन्सर्टचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्रात सध्या छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराजांच्या स्फूर्ती गीतांनी अभिजित जाधव आणि अम्मू जाधव या भावंडांच्या शिव-शंभो गर्जना या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्ताने नॉर्थकोर्ट मैदानावर शिवभक्तांची शिव-शंभो गर्जना लक्ष वेधून घेतले.

छत्रपती संभाजी महाराज यांच्या मूर्तीस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी माजी उपमहापौर पद्माकरनकाळे, माजी परिवहन सभापती राजन जाधव, माजी नगरसेवक गुरूशांत धुत्तरगावकर, उद्योजक मनीष सुरवसे, छत्रपती संभाजी महाराज जी संभाजी आरमार १७पन दिनानिमि शिवडांगो गर्जना हिंदू बहुभाषिक पुरोहित संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष वेणुगोपाल जिल्ला, धाराशिवचे माजी नगरसेवक पिराजी मंजुळे, संभाजी आरमारचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे, कार्याध्यक्ष शिवाजी वाघमोडे यांची उपस्थिती होती. संभाजी आरमारचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे याप्रसंगी बोलताना म्हणाले संभाजी आरमारने सर्वसामान्य जनतेच्या न्यायाची घेतलेली भूमिका यापुढेही अबाधित राहील. संभाजी आरमारची ताकद वाढणे म्हणजे सर्वसामान्य माणसाची ताकद वाढणारी आहे. सत्तेच्या नव्हे सत्याच्या जोरावर संभाजी आरमार सर्वदूर कार्यरत राहणार आहे. दरवर्षी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. अभिजित जाधव आणि अम्मू जाधव यांनी सादर केलेल्या शिवगीतांनी तसेच गोंधळ गीते आणि देशभक्तीपर गीतांनी वातावरण शिवमय झाले होते. यावेळी विद्युत रोषणाई, फटाक्यांची आतषबाजी आणि हजारोंच्या मुखातून होणारी शिवरायांच्या जयजयकाराच्या गर्जनेने मैदानावरील प्रत्येकजण मंत्रमुग्ध झाला होता. अडीच तासाच्या सादरीकरणामध्ये जाधव बंधूनी शिवकाळाची अनुभूती दिली. वाद्यवृंदानी देखील बहारदार सादरीकरण केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संभाजी आरमारचे कार्याध्यक्ष शिवाजी वाघमोडे, उपाध्यक्ष शशिकांत शिंदे, सरचिटणी गजानन जमदाडे, जिल्हाप्रमुख अनंत नीळ, शहरप्रमुख सागर ढगे, जिल्हा संघटक अमित कदम, उपजिल्हाप्रमुख राजेश पाटील, सागर संगवे, उपशहरप्रमुख रेवण कोळी, राज जगताप, विभागप्रमुख मल्लिकार्जुन पोतदार, सोमनाथ मस्के, प्रदीप मोरे, तेजस चौधरी, नारायण माने आदींनी परिश्रम घेतले.

# माझे घर, माझा अधिकार

## राज्यात आता नवीन गृहनिर्माण धोरण

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मंगळवार, 20 मे रोजी राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीला मंत्रिमंडळातील अनेक मंत्री उपस्थित होते.

या बैठकीत राज्याच्या हिताचे 8 महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. या बैठकीत सर्वसामान्यांसाठी घराचा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. दरम्यान, फडणवीस सरकारचा आजच विस्तार झाला असून राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी आजच मंत्रिपदाची शपथ घेतली. अद्याप छगन भुजबळ यांना कुठलंही खातं देण्यात आलं नाही. मात्र, त्यांना अन्न आणि नागरी पुरवठा हे खातं दिलं जाऊ शकतं.

राज्यात महायुतीचे सरकार आल्यापासून दर मंगळवारी राज्य मंत्रिमंडळाची बैठक घेण्यात येत आहे. या बैठकीच्या माध्यमातून राज्यातील विकासासंदर्भात अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात येत आहे. मंगळवार, 20 मे रोजी झालेल्या बैठकीत आठ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहे. मंत्रिमंडळ बैठकीत जलसंपदा विभागात 4, विधी व न्याय विभागात एक, नगरविकास विभागात एक, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागात एक आणि गृहनिर्माण विभागात एक असे एकूण 8 महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. राज्याचे नवीन गृहनिर्माण धोरण जाहीर झाले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याची माहिती दिली. 'माझे घर-माझे अधिकार' या अंतर्गत हे धोरण राबवले जाईल. सर्वांसाठी घर उपलब्ध व्हावे, हाच याचा उद्देश आहे. यासाठी 70 हजार कोटींची गुंतवणूक केली जाणार असून झोपडपट्टी पुनर्वसन ते पुनर्विकास असा सर्वांगीण कार्यक्रम राबवला जाणार आहे.

# शेतकऱ्याने शरद पवारांना भेट दिला 3 किलोचा 'शरद मॅंगो'

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील एका शेतकऱ्याने शरद पवार यांची भेट घेत त्यांना आंबे भेट दिले. या आंब्याचे नाव व वैशिष्ट ऐकुन शरद पवार भारावून गेले. पवारांनी स्वतः फोटो पोस्ट केले. शरद पवार यांनी स्वतःफेसबुकवर फोटो पोस्ट करुन या आंब्याची माहिती दिली. फळांचा राजा असलेला आंबा आपला गोडवा टिकवून प्रयोगशील आंबा बागायतदारांना समृद्ध करतोय हे पाहून समाधान वाटतं असं शरद पवार यांनी पोस्ट केलं आहे.



**एकच आंबा तीन किलोचा**

हा एकच आंबा तब्बल तीन किलोचा आहे. सोलापूर जिल्ह्यातील शेतकरी दत्तात्रय घाडगे यांनी शरद पवारांना हा आंबा भेट दिला. त्यांनी या आंब्याच्या वाणाला 'शरद मॅंगो' असं नाव दिलं आहे.

**आंब्याची खासियत**

या नव्या प्रकारच्या आंब्याची खासियत म्हणजे केवळ त्याचे वजनच नाही, तर त्यामागील संशोधनात्मक शेतीही आहे. गाडगे यांनी केसर, झाडी, केला अशा विविध आंबा प्रजातींचं ग्राफ्टिंग करून हे वाण विकसित केलं आहे.

**फळबाग योजना**

शरद पवार मुख्यमंत्री असताना त्यांच्या कार्यकाळात सुरू झालेल्या फळबाग योजनेच्या आधारे दत्तात्रेय गाडगे यांनी आंबाच्या प्रयोगाला सुरुवात केली.

**आठ एकर जमिनीवर लागवड**

गाडगे यांनी त्यांच्या आठ एकर जमिनीवर सुमारे दहा हजार केशर आणि आंब्याची झुडुपे लावली होती. नंतर, त्यांनी आणखी बदल केले आणि 'शरद आंबा' ही नवीन अंब्याची जात तयार केली.

**देशभरातील ओखळ**

दत्तात्रय गाडगे यांना खात्री आहे की, शरद मॅंगो भविष्यात महाराष्ट्राचाच नाही तर देशभरातील ओखळ बनू शकतो.

**...म्हणून शरद पवारांचे नाव**

शरद पवार यांनी सुरु केलेल्या योजनांमुळेच आज त्यांना हे यश मिळालं आणि म्हणूनच त्यांना या आंब्याचे नाव देखील शरद पवार यांच्या नावावरुन ठेवलं आहे.

# अक्कलकोट रोड एमआयडीसीत आगीच्या दुर्घटना होऊ नयेत यासाठी उप समिती गठित करावी - जिल्हाधिकारी आशीर्वाद

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** अक्कलकोट रोड एमआयडीसी येथे दिनांक 18 मे 2025 रोजी पहाटे एका टॉवेल कारखान्याला आग लागून त्यात आठ नागरिकांचा मृत्यू झाला. ही अत्यंत दुदैवी घटना होती. तसेच यापूवीर्ही एमआयडीसीमध्ये आगीच्या घटना झालेल्या असून अशा दुर्घटना होऊ नयेत यासाठी एक उपसमिती गठित करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.



अक्कलकोट रोड एमआयडीसी येथे झालेल्या टॉवेल कारखान्याच्या आग दुर्घटनेबाबत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आज महापालिका प्रशासन, विद्युत वितरण कंपनी, अग्निशामक दल, आपत्ती व्यवस्थापन तसेच विविध विभाग व यंत्रमाग संघ यांची जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आढावा बैठक घेतली. त्याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी सोलापूर महापालिका आयुक्त सचिन ओंबासे, एमआयडीसीचे विभागीय अधिकारी शिवाजी राठोड, अतिरिक्त महापालिका आयुक्त रवी पवार तसेच संदीप कारंजे, अधीक्षक अभियंता महावितरण सुनील माने, उपविभागीय अधिकारी सदाशिव पडदुणे, तहसीलदार निलेश पाटील व सोलापूर यंत्रमाग संघाचे पदाधिकारी तसेच अग्निशमन दलाचे अधिकारी व सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की, अक्कलकोट रोड एमआयडीसी मध्ये वारंवार घडणाऱ्या आगीच्या घटनांमुळे जीवित व वित्तीय हानी होत आहे. त्यामुळे सर्व संबंधित विभागाच्या विभाग प्रमुख तसेच सोलापूर यंत्रमाग संघाचे प्रतिनिधी यांची सर्व समावेशक अशी एक उपसमिती एमआयडीसी ने गठीत करावी. एमआयडीसीच्या सुरक्षेच्या दृष्टीने या समितीने सर्वसमावेशक विचार करून एक कृती आराखडा तयार करावा व पुढील महिन्यात प्रशासनाला सादर करावा, असेही त्यांनी सूचित केले.

अग्निशामन दलाच्या बंबांना पाणी भरण्यासाठी एमआयडीसी परिसरातच वॉटर फिडर पॉईट निर्माण करण्याबाबत जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सूचित केले. यावेळी त्यांनी आग लागलेल्या कारखान्याच्या प्रथमदर्शी कर्मचारी यांच्याकडून आगीचे कारण समजून घेतले. तसेच आग विझवण्यासाठी आलेल्या अडचणींची ही माहिती त्यांनी घेतली. त्यावेळी त्यांनी एमआयडीसीचे अधिकारी, अग्निशमन दलाचे अधिकारी, महसूलचे अधिकारी व पोलीस प्रशासन यांच्याकडून आगीची कारणे तसेच ती विजवण्यासाठी केलेल्या उपाययोजनांची सविस्तर माहिती घेतली. तसेच एमआयडीसीमध्ये वीज वितरण कंपनीची डीपी फिडर, लाईन याविषयी वीज वितरण कंपनीच्या वीज निरीक्षक यांनी सविस्तर माहिती घेऊन अहवाल सादर करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

एमआयडीसी परिसरातील वीज वितरण (पान 2 वर..)

# सीटूच्या वतीने सरकारच्या विरोधात जोरदार हल्लाबोल

## सरकारला सळो की पळो करू

## कॉ. आडम मास्तर यांचा जळजळीत इशारा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** भारताची एकंदरीत आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती पाहता अत्यंत चिंताजनक आहे. केंद्र सरकार देशाला विकासाकडे नेत असल्याची वल्गना करताना महागाई, बेरोजगारी, आर्थिक विषमतेचा दर देशाच्या विकास दराच्या दुप्पटीने वाढलेला आहे. हे सरकार मान्य करायला तयार नाही. आजही भूकबळी, शेतकऱ्यांची आत्महत्या, बेरोजगार तरुणांची आत्महत्या, कर्ज बाजारीपणा या सामाजिक प्रश्नांची तीव्रता दिवसेंदिवस उग्ररूप धारण करत आहे. हि वस्तुस्थिती लक्षात



न घेता सरकार आर्थिक नाड्या भांडवलदारांच्या हातात देण्याचे काम करत आहेत. देशाची अर्थ व्यवस्था बळकट करणारे सार्वजनिक उद्योगांचे खाजगीकरण करून बड्या (पान 2 वर..)


अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री- पुरुषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या

**सेक्स समस्या**

जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन

**डॉ.अभय मुथा** (मनोलैंगिक विकार तज्ञ)

B.H.M.S.,M.D (A.M) , M.D (Acu ).,P. G ( Sexology )

२१ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)

१ लाखांहून अधिक रुग्णांवर यशस्वी उपचार

**सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक**

विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर

www.sextreatment.in

94 22 23 90 13

## संपादकीय

# कोचिंग क्लासची संस्कृती

शाळा–महाविद्यालये केवळ नावापुरतीच उरली असून, 'क्लासेसमधूनच यश मिळते' अशी चुकीची समजूत समाजमनात खोलवर रूजली आहे. हे भयंकर वास्तव आहे. आज भारतीय शिक्षणक्षेत्र एका गंभीर वळणावर येऊन ठेपले आहे. शिक्षणाचे केंद्रीकरण शाळा व महाविद्यालयांच्या हातून निसटून खासगी कोचिंग क्लासेसकडे झुकत चालले आहे. खरं शिक्षण क्लासमध्येच मिळतं ही अपप्रवृत्ती पालक, विद्यार्थी आणि समाजाच्या मानसिकतेत खोलवर रुजली आहे. या कोचिंग क्लास संस्कृती'चा प्रसार इतका वेगाने होत आहे की, शैक्षणिक व्यवस्थेवरच प्रश्नचिन्हे निर्माण होऊ लागले आहेत. आज शिक्षण म्हणजे केवळ 'गुण कसे मिळवायचे ?' या प्रश्नाभोवती फिरणारी एक शर्यत बनली आहे. या शर्यतीत शाळा–महाविद्यालये मागे पडत असून पुढे निघाले ते कोचिंग क्लासेस! मुलांच्या आयुष्यातील सर्व वेळ, ऊर्जा आणि पालकांच्या खिशातील पैसा खासगी कोचिंगच्या विळख्यात अडकले आहेत. शिक्षणक्षेत्राची दिशाच बदलून टाकणारी ही 'कोचिंग संस्कृती' शैक्षणिक व्यवस्थेच्या मुळावर घाव घालू लागली आहे.

सध्याच्या शिक्षणपद्धतीत एक गंभीर आणि चिंताजनक प्रवृत्ती पाहायला मिळते– विद्यार्थ्यांनी पारंपरिक शिक्षण संस्था म्हणजेच शाळा व कॉलेजकडे पाठ फिरवून कोचिंग क्लासेसकडे धाव घेत आहेत. शिक्षण हे केवळ गुण मिळवण्याचं साधन' बनल्यामुळे, त्या दिशेने झपाट्याने चाललेली ही धाव वास्तवात अनेक शैक्षणिक प्रश्नांची जननी ठरली आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आयुष्याचा केंद्रबिंदू शाळा महाविद्यालये. जिथे शिक्षकांचा सुसंवाद, सहशिक्षकांच्या संवादातून होणारे समृद्धीकरण आणि अभ्यासाबरोबरच सहशालेय उपक्रमांची समांतर वाटचाल इत्यादी. पण आज विद्यार्थी जीवनातून हा सांघिक शिक्षणाचा गाभा हरवत चालला आहे की काय अशी परिस्थिती निर्माण होऊ पाहत आहे. कारण पालकांच्या मनात एक भीती बसवली गेली आहे– क्लास लावला नाही तर मूल मागे पडेल! शिक्षक रिकाम्या वगार्ला शिकवतो आणि त्याचा थेट परिणाम अभ्यासाच्या गुणवत्तेवर होतो. वर्गात जे शिकवले जाते तेच क्लासमध्ये पुन्हा शिकवले जाते, पण फी च्या दुप्पट किमतीत. ही दुहेरी शिक्षण व्यवस्था समाजात एक गोंधळ निर्माण करते. त्यामुळे शाळा–कॉलेज केवळ 'सर्टिफिकेट मिळवण्याचे ठिकाण' बनून राहतात.

आजच्या स्पर्धेच्या युगात, महानगरांतील नामांकित क्लासेसमध्ये विद्यार्थ्यांकडून आठवी–नववीपासूनच स्पर्धा परीक्षांची तयारी करवून घेतली जाते. या साऱ्या पार्श्वभूमीवर शिक्षण व्यवस्थेचे विदारक वास्तव समोर येते. एकेकाळी शिक्षक म्हणजे ज्ञानदाते, मार्गदर्शक आणि आदर्श मानले जायचे. पण आज 'शिक्षण' एक व्यवसाय बनले आहे, तर 'कोचिंग' हे बाजारपेठेतील विक्रीयोग्य उत्पादन झाले आहे. आज मोठमोठ्या शहरांपासून गावांपर्यंत अशा परीक्षांच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांची उलाढाल करणारे कोचिंग क्लासेस उभे राहिले आहेत. आज शिक्षक हे 'कोच' झाले आहेत आणि शिक्षण हे 'सेवा' न राहता थेट उद्योग बनले आहे. कोचिंग क्लासेसचं अवाजवी बाजारीकरण हे शिक्षणाच्या शुद्धतेवर आणि विद्यार्थ्यांच्या भविष्यावर गडद सावली टाकत आहे. एका वर्षासाठी लाखो रुपये फी भरावी लागते. अनेक कोर्सेससाठी विविध क्लासेस विद्यार्थ्यांना आकर्षित करतात. दरवर्षी लावलेल्या मोठ्या जाहिराती, टॉपर मुलांचे फोटो लावून मानसिक खेळ खेळला जातो. पालकही महागडा क्लास म्हणजे चांगले शिक्षण असा समज करून घेतात आणि मोठ्या आर्थिक ओझ्याखाली वावरतात. काही मोठ्या कोचिंग संस्थांचे टायअप इतके महागडे असतात की घरचं सोनं गहाण ठेवून फी भरावी लागते. ही रक्कम इतकी अवाजवी आहे की ती शिक्षणाच्या नैतिकतेवर प्रश्न उपस्थित करते. अनेक क्लासेस शुल्कपरतावा नाकारण्याचे स्पष्ट धोरण ठेवतात. प्रवेश घेतल्यानंतर कोणतीही तक्रार ग्राह्य धरली जात नाही. धोरणे नीट वाचूनच प्रवेश घ्या, हा त्यांचा ठाम आणि निर्भीड आग्रह असतो, जणू शिक्षण नव्हे तर करार केला जातो. काही शाळा–कॉलेजेस तर क्लासेससोबतच समन्वय साधून 'इंटिग्रेटेड' अभ्यासक्रम राबवत आहेत. कोचिंग क्लासेस आणि शाळा–कॉलेजमधील ही एक अपवित्र युती म्हणावी लागेल. यातून शाळा–कॉलेजलादेखील काही फायदा मिळत असल्याने ते मूग गिळून गप्प राहतात. हे या क्लास–शैक्षणिक संस्था युतीतून शिक्षणाचा खरा आत्मा हरवत चालला आहे. या सगळ्यातून शैक्षणिक दलालीचं भयंकर रूप तयार होत आहे.

या सगळ्या पार्श्वभूमीवर, आज शिक्षण व्यवस्थेत एक खोल विषमता निर्माण होत आहे. एक सामाजिक विषमता वाढत आहे. गरीब विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळत नाही आणि शिक्षण फक्त श्रीमंतांसाठी आरक्षित होत आहे. कोचिंग क्लासेसचे वाढते अस्तित्व हे केवळ शैक्षणिक संकट नाही; ते सामाजिक अन्याय, मानसिक आरोग्य आणि आर्थिक शोषणाचे मूळ बनत चालले आहे. त्यामुळे, आजही वेळ आहे शिक्षण क्षेत्राने स्वतःकडे बघण्याची. शाळा–कॉलेज हे शिक्षणाचे खरे केंद्र असावे आणि क्लासेस हे केवळ पूरक माध्यम असावे, याकडे धोरणात्मक पातळीवर लक्ष द्यायला हवे. अन्यथा 'शाळा' नावाच्या संस्थेचा समाजातला आदर संपेल आणि शिक्षण ही केवळ विक्रीसाठी असलेली वस्तू बनेल आणि ती स्थिती कोणालाही हितावह ठरणार नाही. या क्लास संस्कृतीला लगाम घालणे गरजेचे आहे.

# दिवसेंदिवस वाढत्या आगीच्या घटना अत्यंत चिंताजनक

देशात दिवसेंदिवस आगीच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. यात काही नैसर्गिक तर काही मानवी चुकांमुळे आगीच्या घटना घडतांना दिसतात. तेलंगाणाची राजधानी हैदराबाद येथील ऐतिहासिक चारमिनारस्थित गुलजार हाऊसच्या एका इमारतीला दिनांक १८ मे २०२५ ला सकाळी भीषण आग लागली.या भीषण आगीत दुर्दैवाने ८ बालकांसह १७ जणांचा होरपळून व गुदमरून मृत्यू झाला ही भयावह घटना अंगावर शहारे येणारी आहे. ही घटना शॉटसर्कीटमुळे झाल्याचे सांगितले जाते. ही आग चारमिनार या गजबजलेल्या परिसरातील एका इमारतीतील तळघरात अचानक आग लागली आणि बघता बघता आगीने रौद्ररूप धारण केले व आगीचे लोण वरच्या मजल्यावर पसरले आणि आगीने विक्राळ रूप धारण करू १७ लोकांचा बळी घेतला व अनेक जण जखमी झाले.याच दिवशी सोलापूर शहरातील अक्कलकोट रोड एमआयडीसी येथील सेंट्रल इंडस्ट्रीज या टॉवेल कारखान्याला रविवार १८ मे रोजी पहाटे ३.३० ते ४ वाजण्याच्या सुमारास भीषण आग लागली व क्षणातच आगीने रौद्ररूप धारण केले आणि अग्नितांडव सुरू झाले. यात ८ जणांचा होरपळून मृत्यू झाला व अनेक जण जखमी झाले. या दोन्ही घटनांमध्ये २५ नागरिकांचा मृत्यू झाला व अनेक जण जखमी झाले ही अत्यंत चिंताजनक बाब आहे.परंतु आगीचे कारण अद्याप समजू शकलेले नाही.परंतु चारमिनार परिसरातील आग असो अथवा सोलापुरातील टॉवेल कारखान्याला लागलेली भीषण आग असो या दोन्ही आगीच्या घटना मानवी चुकांमुळे झाल्याचे दिसून येते. कारण शॉटसर्कीट का होते याचे मुख्य कारण म्हणजे इलेक्ट्रिक विभागाकडून ऑडिट न करने किंवा इलेक्ट्रिकची तपासणी न करता त्याकडे दुर्लक्ष केल्याने शॉटसर्कीटचे प्रकार राज्यासह देशात मोठ्या प्रमाणात वाढत आहे.म्हणजेच इलेक्ट्रिकच्या बाबतीत टेक्नीकल फॉल्टकडे दुर्लक्ष केल्याने अशा भयावह घटना नेहमीच घडत असतात व यामुळे जीवीत हाणी मोठ्या होत आहे.वाढती लोकसंख्या, शहरीकरण, औद्योगिकीकरण, गगनचुंबी इमारती, वातानुकूलित संयंत्र याठिकाणी आगीचे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.बदलते हवामान,वाढती लोकसंख्या, शहरीकरण आणि औद्योगिकीकरण यांमुळे होणाऱ्या आगीच्या भयावह घटना पहाता स्थानिक प्रशासन, राज्य प्रशासन व केंद्र सरकारने या घटनांकडे जातीने लक्ष देण्याची गरज आहे.कारण एक आगीची घटना करोडोंची वित्तीय हानी तर होतेच सोबतच मोठ्या प्रमाणात जीवित हानी सुध्दा होतांना आपण पहातो ही जीवीत हानी कदापि भरून काढता येत नाही.याकरीता देशातील संपूर्ण राज्य सरकारांनी व केंद्र सरकारने अग्निशमन विभागाला सशक्त करून अत्याधुनिक यंत्र सामग्री ताबडतोब अग्निशमन विभागाला पुरविने अत्यंत गरजेचे आहे. त्याचप्रमाणे अग्निशमन विभागात मोठ्या प्रमाणात कर्मचाऱ्यांची कमतरता दिसून येते त्याचीही पुर्तता सरकारने युध्दपातळीवर करने अत्यंत गरजेचे आहे. कारण मनुष्यबळा शिवाय कोणतेही काम शक्य नाही. त्याचप्रमाणे बदलत्या काळानुसार अत्याधुनिक यंत्रसामग्रीची नितांत गरज आहे आणि आगीच्या वाढत्या घटना पहाता औद्योगिक परिसरात आणि गर्दीच्या ठिकाणी अग्निशमन व्यवस्था सक्तीची करायला हवी.कारण राज्यात किंवा देशात छोट्या–मोठ्या आगीच्या घटना दररोज कुठे ना कुठे होतांना आपण पहातो आणि यामुळे मोठ्या प्रमाणात वित्तीय व जीवीत हाणी होत आहे ही अत्यंत गंभीर व संवेदनशील बाब आहे यावर राज्य सरकारांनी व केंद्र सरकारने गांभीयार्ने लक्ष केंद्रित केले पाहिजे व आगीच्या घटना टाळण्यासाठी सर्वतोपरी उपाय योजना करण्याची नितांत गरज आहे.चारमिनार परिसरातील व सोलापूर इंडस्ट्रीज मधील आगीत मृत्यूमुखी पडलेल्यांच्या प्रती श्रद्धांजली अर्पण करतो. जय हिंद.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

पान १ वरून

## 'एका भ्रष्ट मंत्र्याच्या...

अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी आज राजभवन येथे मंत्रीपदाची शपथ घेतली. याच भुजबळांवर विरोधात असताना भाजपने भ्रष्टाचाराचे आरोप केले होते. त्यावरून आता काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांनी भाजपवर जोरदार टीका केली आहे.

'छगन भुजबळही आज भाजपच्या वॉशिंग मशीनमध्ये धुऊन स्वच्छ झाले', असा टोला त्यांनी भाजपला लगावला आहे.

'छगन भुजबळही आज भाजपच्या वॉशिंग मध्ये धुऊन स्वच्छ झाले. ज्या छगन भुजबळांवर भाजपने आरोपांची राळ उठवली, ईडी लावून त्यांना जेलमध्ये पाठवले. त्याच भाजपाने त्यांना आता पावन करून घेतले आहे. सत्तेसाठी भाजप कोणत्याही थराला जाऊ शकते आणि काहीही करू शकते हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे', असे ट्विट सकपाळ यांनी केले आहे.

## सीटूच्या वतीने सरकारच्या विरोधात...

भांडवलदारांना नफेखोरीसाठी कवडीमोल दराने मोकळीक दिली आहे. हा जनतेसोबत केलेला अक्षम्य घात आहे.

कामगारांनी गेली अनेक वर्षे संघषार्तून मिळविलेले ४४ कामगार कायद्यांपैकी २९ कामगार कायदे चार श्रम संहितांमध्ये परिवर्तीत करुन कायद्याची धार बोथट करण्याचा प्रयत्न केला आहे. याला सर्व केंद्रीय व राज्य कामगार संघटना, फेडरेशन विरोध करत असून मालक धार्जिणे केंद्र व राज्य सरकार कोणत्याही क्षणी याची अंमलबजावणी करण्याच्या प्रयत्नात आहे.

किमान वेतन, पेन्शन, सामाजिक सुरक्षा हे कामगारांचे हक्क आहेत त्याला नख लावल्यास सरकार ला सळो की पळो करू जळजळीत इशारा ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉ नरसय्या आडम मास्तर यांनी दिला.

ते पुढे म्हणाले की, काश्मीर मधील अनंतनाग जिल्ह्यातील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी अतिरेकी हल्लूयात निष्पाप भारतीय पर्यटकांचा बळी गेला त्याला प्रत्युत्तर देत भारतीय जवानांनी हल्ला करून उत्तुंग कामगिरी बजावली. यात सोफिया कुरेशी व व्योमिका सिंग यांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली हे अभिनंदनीय बाब आहे. भारतीय शौर्य वीर सैनिकांच्या विजयी सन्मानार्थ आणि देशातील युद्धजन्य परिस्थिती व वस्तुस्थिती पाहता 20 मे चा देशव्यापी सार्वत्रिक संप मागे घेऊन ते 9 जुलै रोजी जाहीर केल्याची माहिती दिली.

सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्स जिल्हा समिती सोलापूर च्या वतीने ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉ नरसय्या आडम मास्तर व सीटू चे राज्य महासचिव ॲड एम एच शेख यांच्या नेतृत्वाखाली जनता व कामगार विरोधी धोरणांविरुद्ध 20 मे रोजी जिल्हा परिषद पूनम गेट येथे धरणे आंदोलन पार पडले. यावेळी सरकार विरोधात जोरदार हल्लाबोल करत गगनभेदी घोषणाबाजी द्वारा केंद्र आणि राज्य सरकारचा निषेध करण्यात आला.

यावेळी मंचावर माजी नगरसेविका नसीमा शेख, नलिनी कलबुर्गी, व्यंकटेश कोंगारी, सुनंदा बल्ला, पुष्पा पाटील, ॲड अनिल वासम आदींनी सभेला संबोधित केले.

मंगळवारी 20 मे रोजी लाल बावटा विडी,यंत्रमाग, बांधकाम, रेडीमेड व शिलाई कामगार युनियन सिटू संलग्न च्या वतीने माजी नगरसेविका कॉ.सुनंदा बल्ला यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाद्वारे निवासी उपजिल्हाधिकारी यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यावेळी शिष्टमंडळात ॲड अनिल वासम, दत्ता चव्हाण, विरेंद्र पद्मा,शकुंतला पाणीभाते, राजेश्वरी पद्मा, अमित मंचले, शहाबुद्दीन शेख, अशोक बल्ला अरुण सामल, शाम आडम आदींची उपस्थिती होती.

यावेळी सिटू ची भूमिका मांडताना सिटू चे राज्य महासचिव कॉ.एम एच शेख म्हणाले की, कामगारांनी गेली अनेक वर्षे संघषार्तून मिळविलेले ४४ कामगार कायद्यांपैकी २९ कामगार कायदे चार श्रम संहितांमध्ये परिवर्तीत करुन कायद्याची धार बोथट करण्याचा प्रयत्न केला आहे. याला सर्व केंद्रीय व राज्य कामगार संघटना, फेडरेशन विरोध करत असून मालक धार्जिणे नरेंद्र मोदी सरकार कोणत्याही क्षणी याची अंमलबजावणी करण्याच्या प्रयत्न ात आहे. हे कोणत्याही परिस्थितीत आम्ही होऊ देणार नाही असा निर्धार या प्रसंगी व्यक्त केला.

यावेळी दीपक निकंबे, मुरलीधर सुंचू, सिद्धराम उमराणी, दाऊद शेख, नरेश दुगाने, अकील शेख, राजेश काशिद,युसुफ शेख, नितीन कोळेकर, नितीन गुंजे, प्रकाश कलबुर्गी, विक्रम कलबुर्गी, वसीम मुल्ला,रफिक काझी,आप्पाशा चांगले, वसीम देशमुख,राजू गेंट्याल,प्रभाकर गेंट्याल, योगेश आकिम, नरेश गुल्लापल्ली,इमाम शेख, महिबूब मणियार, चंटी बिटला, दिनेश बडगु, बाळकृष्ण मल्याळ, विजय हरसूरे, मल्लेशम कारमपुरी, अभिजीत निकंबे, मोहन कोक्कुल, शिव श्रीराम, मल्लिकार्जुन बेलियार, प्रकाश कुऱ्हाडकर, गोपाळ जेकलेर आदींनी परिश्रम घेतले.

## प्रबोधन

# सारे घाबरती । दहशतवाद्यांना

### राजीव गांधी स्मृती दिन (२१ मे) दहशतवाद हिंसाचारविरोधी दिन

भारतीय रेल्वेच्या वातानुकूलित डब्यात एखादा हुशार माणूस शिरला, तर तो बैठक मारण्यापूर्वी डब्याचा कानाकोपरा नजरेखाली घालेल. कारण आपला देश दहशतवाद्यांच्या कारवायांनी झाकोळलेला आहे, हे त्याला नीट माहीत असतं. मात्र, हाच माणूस युरोप–अमेरिकेच्या मेट्रोमध्ये निवांतपणे बसेल. कारण तिथल्या सुरक्षा यंत्रणा अत्यंत कर्तव्यतत्पर आहेत, हे त्याने जाणलेलं असतं. भारतासारखा व्यवस्थाहीन भोंगळ भाग्यवादी, विषमताग्रस्त, अडाणी आणि प्रशासकीय शिस्त नसलेल्या देशासारखा दहशतवादाला पोषक देश जगाच्या पाठीवर दुसरा कोणताही नसेल. शिवाय भारताची वर्णवर्चस्वाच्या दहशतीतून आता कुठे सुटका होते न होते तोच विविध प्रकारच्या दहशतवादाचे छळ त्यांच्या वाट्याला यावेत, हा शहाण्या माणसांना चिंताग्रस्त करणारा प्रकार आहे. दहशतवादाची पैदास कशी होते, हे सांगताना समाजचिंतक प्राचार्य पी.बी.पाटील म्हणतात, ह्यविद्या, सत्ता, संपत्तीवर अधिकार मिळवून बसलेल्या मूठभर लोकांच्या किंवा राष्ट्राच्या विरोधात खदखदणारा असंतोष म्हणजे दहशतवाद.' तसंच धर्म, शिक्षण, राजकारण, अर्थकारण सर्व काही सत्ता–मत्ताधाऱ्यांसाठी राबवल्याच्या विरोधातील राग–क्रोधाचं प्रकट रूप म्हणजे दहशतवाद, जिहाद क्रुसेडच्या पार्श्वभूमीवर धर्मांधानी घडवून आणलेलं क्रौर्य, निर्घृणता यांचं चिथावणीखोर रक्तरंजित प्रकटीकरण म्हणजे दहशतवाद, विवेकहीन गरिबांना स्वर्गप्राप्तीचं आमिष दाखवून त्यांच्याकडून निष्पाप लोकांचे बळी घेतले जाणं म्हणजे दहशतवाद, विषमतेच्या विरोधाचं लेबल लावून विकृत मनोवृत्तीने रक्तपात, विध्वंस घडवणं म्हणजे दहशतवाद. या पार्श्वभूमीवर मनुष्यजातीचं भविष्य किती भीषण आहे ते सांगताना प्राचार्य शिवाजीराजे भोसले म्हणतात, 'गतकाळाशी तुलना करता आजचं जीवन वैभवसंपन्न वाटतं. पण निसर्गदत्त मनुष्यत्व पंगू होण्याचं भय निर्माण झालं आहे. नजीकच्या भयावह भविष्यकाळात जीवजंतूची शस्त्रं करून माणसं परस्परांशी लढतील व जराजर्जर होऊन मरतील.

धर्म व संस्कृतिजन्य अतिरेकी– दहशतवादाचं जुनं पर्व संपण्यापूर्वीच भारतात १९६७पासून नवं पर्व नक्षलवाद्यांच्या अर्थात माओवाद्यांच्या कारवायांपासूनच सुरू झालं. पण आता या दहशतवादाच्या जोडीला आंतरराष्ट्रीय दहशतवादही पुढे काही काळाने उपटला. प्राचार्य पी.बी.पाटील नोंदवतात, '१९९४पूर्वी तालिबान्यांचं नावही कुणी ऐकलं नव्हतं. पण यांची निर्मिती केली अमेरिकेने. सत्तास्पर्धेसाठी पाकिस्तानच्या कोंबडीखाली ही पिलावळ उबवून तिला शस्त्रसज्ज करून धर्मांधतेची दारू पाजून अफगाणांवर सोडली.' त्यानंतर आज तर दहशतवादी कारवायांचं पेवच फुटलं आहे. मुस्लीम दहशतवाद्यांबरोबर हिंदू दहशतवादीही क्रियाशील झालेत. जनमानसात आपल्या कारवायांची नोंद व्हावी, पुरोगामी चळवळी थंड पडाव्यात म्हणून स्फोटांची, हत्याकांडाची, अपहरणाची जबाबदारी दहशतवादी जाहीरपणे घेऊ लागलेत. हे निर्ढावलेपण महाशक्तींचा त्यांच्यावरील वरदहस्तच सूचित करण्यातून येतं. स्वातंत्र्यदेवीच्या पुतळ्याखाली अमेरिकेने केवढ घाण साचवून मानवतेची विटंबना केली आहे, हे सांगायला कुणा तज्ज्ञ व्यक्तीची गरज नाही. इतिहासकार दहशतवादाची जन्मभूमी म्हणूनच अमेरिकेची आणि युरोपची नोंद घेतात. अमेरिका आणि नाटो राष्ट्रांच्या सत्तासमतोलाच्या आकांक्षेपोटी राजकीय दहशतवाद आणि त्याचं शेपूट धरून माओवादी दहशतवाद शक्य तेथे आज आपल्या विनाशलीलांचं हिडीस प्रदर्शन करीत आहेच. पण आजवर नव्या यंत्रयुगाचं, वाढत्या विज्ञाननिष्ठेचं, पुरोगामी चळवळी आणि विचारांचं समाजात वाढणारं प्रेम पाहून दबून राहिलेले प्रतिगामी, धर्मांध खलपुरुषही समाजाला त्रस्त करून आपले मागास, कालबाह्य संप्रदायसंप्रदाय वाढवू लागले आहेत, शिवाय पैसा आणि प्रसिद्धी मिळवून धन्य होत आहेत. अशा धर्मांध, जात्यंध शक्तींना जगभरचा पैसा गोळा करून पुरवणारे संघटित संभावित छुपे दहशतवादी भारतात दुर्दैवाने दिवसेंदिवस अधिक बळकट होत आहेत. समाजमनाला भुलवणाऱ्या धार्मिक वाहिन्या, सत्संग, मेळावे, देवी–देवांची भक्ती या भ्रमिष्टपणात गुरफटून त्या माध्यमातून राज्यकर्त्यांना चकवणे आणि गुंडाळणे ही त्यांची सराईत खेळी भारताचं वाटोळं करायला टपली आहे.

अशा या परदेशी आणि स्वदेशी दहशतवाद्यांपासून आपला देश, आपला समाज, आपलं पुरोगामित्व, आपले विज्ञाननिष्ठ आचार– विचार, वाढवायचे असतील, तर 'महात्मा जोतिबांचा सार्वजनिक सत्यधर्म, महात्मा गांधीजींचा सत्याग्रही सर्वोदय, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भावलेला बुद्ध धर्म, आणि खास भारतीय अशी अहिंसा, अस्तेय, विश्वबंधुत्व ही अमृततत्वंच जगाला वाचवू शकतील' असा विश्वास प्राचार्य पी.बी.पाटील यांनी व्यक्त केला आहे. प्रत्येक जागृत भारतीयाने दहशतवादाविरुद्ध कंबर कसली, तर दहशतवाद्याला चले जाव म्हणण्याचं सामर्थ्य नक्की प्राप्त होईल. ते आवश्यक आहे. कारण–

जगाचे आरोग्य । आहे बिघडले
क्रियाशील झाले । अतिरेकी ॥१
बड्या राष्ट्रांचे । हे नीचतम चाळे
लोका काय कळे । मर्म त्याचे ? ॥२
मानवी रक्ताची । वाहू लागे नदी
धर्मांध ही साधी । तीच संधी ॥३
परंपरानिष्ठ । म्हणे बरे झाले
छान राबविले । दुष्ट हेतू ॥४
जीवनाची जेव्हा । नसते शाश्वती
उधाणाला भक्ती । येते तेव्हा ॥५
सारे घाबरती । दहशतवाद्यांना
सुरक्षा देवांना । भक्त देती ॥६
बाप्पाचे रक्षण । करितसे बाळ
अतिरेकी काळ । हसे गाली ॥७



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर–416012
92258 09071

# वैभव गंगणे यांच्या निवेदनाची शासनाने घेतली दखल बेघर लाभार्थ्यांच्या रखडलेल्या घरकुलास सुरुवात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सोलापूरच्या अनेक विषयांवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सोशल मीडिया विभाग शहराध्यक्ष वैभव गंगणे व त्यांचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते सातत्यानं आवाज उठवत असतात. सोलापूर मधील रखडलेले काम मार्गी लागेपर्यंत वैभव गंगणे हे सातत्याने पाठपुरावा करत असतात.

याच विषयास अनुसरून सोलापूर शहर – जिल्ह्यामधील बेघरांना तत्काळ निवासस्थानाची व्यवस्था करून देण्यात यावी. या मागणीचे निवेदन राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार,मंत्री अदिती ताई तटकरे यांना वैभव गंगणे यांनी दिले लेखी निवेदना द्वारे दिले होते. प्रधान मंत्री आवास योजने अंतर्गत सुरू असलेले घरकुलांचे काम तांत्रिक अडचणी मुळे प्रलंबित होते. त्यामुळे अनेक बेघर सोलापूरकरांना त्याचा लाभ घेता येत नव्हता.या समस्या तातडीने सोडवून पूर्ववत घरकुलांच्या प्रकल्पास सुरुवात करण्यात यावी अशी मागणी वैभव गंगणे यांनी निवेदनात केली होती.



याची खुद्द राज्याचे कर्तव्य दक्ष उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व आदिती ताई तटकरे यांनी वैयक्तिक दखल घेऊन संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना देत तांत्रिक अडचणीची माहिती जाणून घेऊन पूर्ववत प्रकल्पाच्या कामास सुरू करण्याचे आदेश दिले.

आणि खऱ्या अर्थानं वैभव गंगणे यांच्या लेखी निवेदनाची अजित दादा व आदिती ताई यांनी दखल घेऊन न्याय दिला आता सोलापुरातील बेघर लोकांच्या हक्काचे स्वप्न प्रत्यक्षात साकार होणार असल्याने सोलापूरकरांच्या वतीने वैभव गंगणे यांनी विकासाचा वादा अजित दादा आणि आदिती ताई तटकरे यांचे विशेष आभार प्रकट केले.

यापुढे देखील शहर – जिल्हाध्यक्ष संतोष भाऊ पवार व कार्याध्यक्ष जुबेर भाई बागवान यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापुरातील विविध प्रश्न मार्गी लावण्यासाठी सोलापूरकरांना विविध योजनेंचा लाभ मिळवून देण्यासाठी नेहमी प्रामाणिक पणे कार्यशील राहू अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चे सोशल मीडिया शहराध्यक्ष वैभव गंगणे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केली.

## अक्कलकोट रोड एमआयडीसीत...

कंपनीची वितरण व्यवस्था याबाबत त्रयस्थ संस्थेकडून तपासणी करून घेण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली.

अक्कलकोट एमआयडीसी रोड परिसरात टॉवेल कारखान्याला लागलेल्या आगीबाबत महापालिका आयुक्त सचिन ओंबासे यांनी एमआयडीसी परिसरातील बांधकामे, रस्ते तसेच वीज वितरण व्यवस्थेच्या अनुषंगाने माहिती बैठकीत दिली. तसेच एमआयडीसी कारखाण्यात निवासस्थान नसावीत असेही त्यांनी सांगितले.

उपविभागीय अधिकारी सदाशिव पडदुने यांनी सेंट्रल टेक्सटाईल कारखान्याला लागलेली आग ही शॉर्टसर्किटमुळे लागली असावी असा अंदाज वर्तवून त्या ठिकाणी आग विझवण्यासाठी अग्निशामक दलाचे बंब त्वरित उपस्थित होते, परंतु आग अग्निशामन दलाचे वाहन त्या ठिकाणी जाण्यासाठी रस्ता नव्हता, त्यामुळे आग वाढत गेली. शेवटी जेसीबी मागून इमारतीची भिंत पाडण्यात आली, व त्यानंतरच बचाव कायार्ला व आग नियंत्रणात आणण्यासाठी गती मिळाली असे त्यांनी सांगितले.

यंत्रमाग धारकांच्या प्रतिनिधीच्या म्हणण्यानुसार एमआयडीसी परिसरात आगीच्या घटना वारंवार घडण्यामागे वीज वितरण कंपनीने कमी/अधिक दाबाने वीज पुरवठा करणे हे असल्याचे सांगितले. वीज वितरण कंपनीने एमआयडीसी परिसरात उद्योजकांना आवश्यक दाबाने वीज पुरवठा नियमितपणे केल्यास शॉर्टसर्किटमुळे आग लागण्याच्या घटना घडणार नाहीत, असेही त्यांनी सांगितले.

# महावितरणचा कंत्राटी कर्मचारी, सहायक अभियंता अडकले ACBच्या सापळ्यात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** पीएम सूर्यघर योजनेतून घरांवर सौरऊर्जा पॅनल बसवण्याचे काम करणाऱ्या तक्रारदाराकडून ८ हजार रुपयांची लाच स्वीकारणाऱ्या 'महावितरण'च्या कंत्राटी कर्मचारी योगीनाथ म्हेत्रे याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मंगळवारी (दि.२०) रंगेहाथ पकडले. म्हेत्रे याने अतिरिक्त कार्यकारी अभियंता भरत व्हनमाने यांच्यासाठी ५ हजार आणि सहायक अभियंता स्वाती सलगर यांच्यासाठी ३ हजार रुपये लाच स्वीकारल्याचे कबूल केले आहे. या प्रकरणी तिघांविरुद्ध फौजदारी चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.




तक्रारदाराकडे सातत्याने लाचेची मागणी होत असल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे धाव घेतली. विभागाने सापळा रचून म्हेत्रे आणि सहायक अभियंता स्वाती सलगर यांना ताब्यात घेतले. मात्र, अतिरिक्त कार्यकारी अभियंता व्हनमाने रजेवर असल्याने त्यांना अटक झालेली नाही. ही कारवाई पोलीस उपअधीक्षक गणेश कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक गणेश पिंगुवाले यांच्या पथकाने केली.

या घटनेमुळे सौरऊर्जा योजनेत लाचखोरीचा प्रकार समोर आला असून, प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कठोर कारवाईचे संकेत दिले असून, पुढील तपास सुरू आहे.

## वात्रटिका

### जीव भांड्यात पडला

शपथविधी झाला आणि
जीव भांड्यात पडला...
आधीच होता आमचा
खूर्चीशी जीव जडला...
खाते कोणतेही मिळो
फिकीर त्याची नाही...
मनासारखे झाले म्हणून
आता रुसवा सवा फुगवा नाही...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# सर्व यंत्रणांनी जिल्हा वार्षिक योजना सन 2025-26 चा 935 कोटीचा निधी वेळेत खर्च करावा - पालकमंत्री गोरे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा वार्षिक योजना सन 2025 – 26 अंतर्गत सर्वसाधारण योजना 783 कोटी, अनुसुचित जाती उपयोजना 147 कोटी, आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना 5.44 कोटी असे एकूण 935.44 कोटींचा निधी मंजूर आहे. तरी सर्व शासकीय यंत्रणांनी माहे मार्च 2026 पूर्वी हा निधी खर्च करण्यासाठी काटेकोरपणे नियोजन करावे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक आचारसंहिता विचारात घेऊन सर्व शासकीय यंत्रणा प्रमुखांनी निविदा प्रक्रिया राबवावी. तसेच ज्या यंत्रणांचा निधी खर्च होणार नाही अशा यंत्रणा प्रमुखावर कठोर कारवाई करण्यात येईल, असे निर्देश ग्राम विकास व पंचायतराज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

नियोजन भवन येथील सभागृहात आयोजित जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत पालकमंत्री जयकुमार गोरे मार्गदर्शन करत होते. यावेळी खासदार प्रणिती शिंदे, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, खासदार ओमराजे निंबाळकर, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, सोलापूर शहर पोलीस आयुक्त एम. राजकुमार, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, आमदार सर्वश्री सुभाष देशमुख, देवेंद्र कोठे, समाधान आवतडे, सचिन कल्याणशेट्टी, राजू खरे, अभिजीत पाटील, डॉ. बाबासाहेब देशमुख, नारायण पाटील, उत्तम जानकर (ऑनलाईन), प्र. पोलिस अधीक्षक तथा अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार यांच्या सह सर्व समिती सदस्य उपस्थित होते.



**यावर्षीच्या सर्वसाधारण योजनेसाठी शासनाकडून 121 कोटीचा अतिरिक्त निधी मंजूर**

शासनाने ठरवुन दिलेल्या आर्थिक मर्यादेत जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) करीता रु. 661.89 कोटीचा प्रारुप आराखडा तयार करण्यात आला होता. राज्यस्तरीय बैठकीत 121.11 कोटीच्या वाढीसह जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2025–26 करीता एकूण रक्कम रु. 783.00 कोटीचा निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

पालकमंत्री जयकुमार गोरे पुढे म्हणाले की, जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत मंजूर असलेला 857.84 कोटीचा सर्व निधी शासकीय यंत्रणांनी 31 मार्च 2025 पूर्वी खर्च केलेला आहे. त्याचप्रमाणे सर्व यंत्रणांनी नियोजन समितीकडून कामांच्या याद्या अंतिम करून घ्याव्यात. प्रशासकीय मान्यतेसाठी आवश्यक कार्यवाही त्वरित पूर्ण करावी. ज्या यंत्रणा त्यांनी प्रास्तावित केलेला निधी वेळेत करू खर्च करू शकणार नाहीत त्याची सर्वस्वी जबाबदारी त्या यंत्रणा प्रमुखाची राहील याबाबत दक्षता घ्यावी असेही त्यांनी सूचित केले. त्याप्रमाणेच जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण 2025– 26 करता मंजूर तरतुदी व कामांच्या याद्याचा प्रारुप आराखडा जिल्हा नियोजन समिती पुढे आल्यानंतर समितीची मान्यता असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्ह्यातील घरकुलाचा एकही लाभार्थी जागे अभावी घरकुलाच्या लाभापासून वंचित राहणार नाही. प्रशासनाने 134 घरकुल लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून दिलेली आहे तर उर्वरित दोन हजार लाभार्थ्यांना पुढील दीड महिन्यात जागा उपलब्ध केली जाणार आहे. राज्य शासनाने एकाच वर्षात 30 लाख घरकुले लाभार्थ्यांना मंजूर केलेली असून सोलापूर जिल्ह्यातील लाभार्थ्यांनाही दुप्पट घरकुले मंजूर करण्यात आलेली असून सर्व पात्र लाभार्थ्यांना शंभर टक्के घरकुले उपलब्ध करून देण्यात येतील, अशी ग्वाही यावेळी पालकमंत्री श्री. गोरे यांनी दिली.

सोलापूर जिल्ह्याच्या पाणी नियोजनात थोडीशी गफलत झालेली दिसून येत आहे. तरी पाण्याच्या अनुषंगाने कालवा सल्लागार समितीची बैठक जलसंपदा मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे बुधवार दिनांक 21 मे 2025 रोजी लावण्यात येत असून सर्व लोकप्रतिनिधींनी या बैठकीस उपस्थित राहावे. तसेच याच बैठकीत उजनी वरील जल पर्यटनाच्या अनुषंगाने ही चर्चा करण्यात येईल असे त्यांनी सांगितले. तसेच प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी शेतकऱ्यांच्या मालाची वाहतूक करणाऱ्या छोट्या वाहनावर दंडात्मक कारवाई करू नये. अनेक लोकप्रतिनिधी यांच्याकडून या अनुषंगाने भाजीपाला वाहतूक करणाऱ्या छोट्या छोट्या वाहनावर मोठ्या दंडाच्या कार्यवाही करण्यात आल्याची तक्रार करण्यात येत आहे, त्या अनुषंगाने परिवहन विभागाने याची दक्षता घ्यावी असेही त्यांनी निर्देशित केले.

प्रारंभी जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार यांनी जिल्हा नियोजन समिती समोर मागील बैठकीचे इतिवृत्त व अनुपलन अहवाल ठेवला. तसेच जिल्हा वार्षिक योजना सन 2024– 25 अंतर्गत झालेला खर्च व सन 2025 – 26 चा प्रारूप आराखडा याची माहिती दिली.

**जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2025–26 मंजूर तरतूदी :-**

- कृषी व संलग्नसेवा (पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय, वने, सहकार) – रु. 51.26 कोटी
- ग्रामीण क्षेत्राच्या विकासाच्या योजना – रु. 64.00 कोटी
- ड्रजलसंधारण विभागाच्या योजना – रु. 59.50 कोटी
- ऊर्जा विकास (MSEB व अपारंपारीक ऊर्जा) – रु. 67.00 कोटी
- शिक्षण विभागाच्या योजना – रु. 42.00 कोटी
- महिला व बाल विकासाच्या योजना – रु. 21.08 कोटी
- आरोग्य सेवांचे बळकटीकरण – रु. 50.15 कोटी
- नगर विकास विभाग– रु. 130.00 कोटी
- रस्ते व परिवहन – रु. 73.50 कोटी
- पर्यटन, तिर्थक्षेत्र,गड किल्ले, संरक्षित स्मारके यांचे संवर्धन व विकास –रु. 49.93 कोटी
- पोलिस व तुरुंग व्यवस्थेचे बळकटीकरण – रु. 23.08 कोटी
- दिव्यांगांकरीता 1 % राखीव – रु. 7.00

**लोकप्रतिनिधी यांनी नियोजन समिती केलेल्या मागण्या व मांडलेले मुद्दे पुढीलप्रमाणे....**

मंगळवेढा तालुक्यासाठी म्हैसाळ प्रकल्पाचे पाणी देण्यात यावे, जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांना खरीप रब्बी हंगामातील पीक विम्याची नुकसान भरपाई मिळालेली नाहीत ती भरपाई त्वरित मिळवून द्यावी, सांगोला तालुक्यासाठी मान नदीत पाणी सोडावे, सूर्यघर योजना नागरिकापर्यंत पोहोचवावी तसेच शेतकऱ्यांसाठी असलेले मुख्यमंत्री कृषी सौर ऊर्जा पंप योजनेचे प्रबोधन करावे, शेतातील रोहित्र साठी नियोजन समितीतून दुप्पट निधीची तरतूद करावी, सोलापूर शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी पाण्याच्या टाक्या निर्माण कराव्यात, मोहोळ तालुक्याला हक्काचे पाणी उपलब्ध करून द्यावे, तुषार व ठिबक सिंचन योजनेची सबसिडी शेतकऱ्यांना वेळेत मिळावी यासाठी संबंधित यंत्रणांनी त्वरित कारवाई करावी, उजनी जलाशयातील गाळ व वाळू काढल्यास पाणी साठवून क्षमता वाढेल यासाठी प्रयत्न करावेत, सोलापूर शहरातील सुंदरम नगर येथील जलतरण तलाव महापालिका किंवा क्रीडा विभागाने हाती घेऊन तो त्वरित सुरू करावा, शहरात एलईडी बल्ब लावावेत त्यासाठी आवश्यक निधीची तरतूद करावी, अवैध डान्सबार वर कारवाई करावी, सांगोला येथे ट्रॉमा केअर सेंटरची इमारत उभी असून त्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे, सोलापूर शहराची स्वच्छता तसेच सिद्धेश्वर तलाव प्रदूषण थांबवण्याबाबत महापालिकेने लक्ष घालावे तसेच सोलापूर येथून विमानसेवा लवकर सुरू करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करावी अशा विविध मागण्या खासदार व आमदार महोदय यांनी नियोजन समितीच्या बैठकीत पालकमंत्री महोदय यांच्याकडे केल्या.

# अवैध वाळू व्यावसायिकांवर जोरदार कारवाई

**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** अवैध वाळू उपसा व वाहतूक करणार्यांविरुद्ध करमाळा पोलिसांनी जोरदार कारवाई केली. त्यांच्याकडून 4 लाख 90 हजार रुपये किमतीची 19 ब्रास वाळू जप्त करण्यात आली असून, तिघा इसमावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

ही कारवाई 16 मे रोजी करण्यात आली.

सुहास ऊर्फ सिद्धू भारत तावसे, राजेश महेंद्र रोकडे व आनंद सुखदेव सातव, (सर्व रा. वांगी नं. 3, ता. करमाळा) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. मौजे वांगी नं. 3 येथे चोरून वाळू वाहतूक सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर उपविभागीय पोलिस अधिकारी अजित पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार वरिष्ठ पोलिस निरीक्षक रणजित माने यांनी एक पोलिस पथक तयार करून सापळा रचला.

उजनी जलाशयाच्या नदीपात्रात पोलिस आल्याची चाहूल लागताच सुहास ऊर्फ सिद्धू भारत तावसे व राजेश महेंद्र रोकडे हे वाळूने भरलेला टेम्पो घेऊन तेथून पळून गेले. त्याचा पाठलाग करीत उजनी जलाशयाकडे जात असताना समोरून येत असलेल्या अन्य एका टेम्पोस पोलिसांनी गाडी आडवी लावून तपासणी केली. चालक आनंद सुखदेव सातव, रा. वांगी नं. 3, ता. करमाळा हा टेम्पो जागीच सोडून तेथून पळून गेला. सदर टेम्पोमध्ये 1 ब्रास वाळू मिळून आली.

यावेळी नदीकाठी पाहणी केली असता, उजनी जलाशयाच्या कडेला वाळूचा उपसा करून ढिगारा घातल्याचे दिसून आले. त्याबाबत वाळूचा पंचनामा करून करमाळा पोलिस ठाणे येथे पोलिसांनी तिघांच्या विरोधात गुन्हा दाखल केला. एकूण 4 लाख 90 हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. उपविभागीय पोलिस अधिकारी अजित पाटील, वरिष्ठ पोलिस निरीक्षक रणजित माने, पो.ना. प्रमोद गवळी, मनीष पवार, वैभव टेंगल, सोमनाथ जगताप, अर्जुन गोसावी, रविराज गटकुळ, ज्ञानेश्वर घोंगडे, विलास आलदर, राहुल माने आदिच्या पथकाने ही कामगिरी बजावली.

# दिवसा घरफोडी चोरी करणारी मध्यप्रदेश येथील टोळीस 7 वर्षे कारावास व 2000 रु. दंडाची शिक्षा

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** बार्शी शहर पोलीस ठाणे गुरनं 258/2023 भादविसंक 454, 380, 201, 413, 34, 75 प्रमाणे दाखल दिवसा घरफोडी चोरीच्या गुन्हयाची उकल करुन मध्यप्रदेश येथून रेकॉर्डवरील सराईत आरोपीतांना अटक करुन त्यांचेकडून गुन्हयातील मुद्देमाल हस्तगत करण्यात आले होते. सदर गुन्हयाचा तपास स्थानिक गुन्हे शाखा सोलापूर ग्रामीण चे तात्कालीन पोलीस निरीक्षक सुहाज जगताप यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शैलेश खेडकर व त्यांचे पथकातील सफौ/ ख्वाजा मुजावर, नारायण गोलेकर, धनाजी गाडे, मोहन मनसावाले, प्रकाश कारटकर, अक्षय डोंगरे, अक्षय दळवी, अनिस शेख, धनराज गायकवाड व चालक समीर शेख सर्व नेमणूक स्थानिक गुन्हे शाखा सोलापूर ग्रामीण यांनी करुन गुन्हयातील मुद्देमाल व तांत्रिक पुरावा सी. सी.टी.व्ही फुटेज इत्यादी हस्तगत करुन आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले होते.

सदर गुन्हयातील आरोपी यांना दिनांक 19/04/2023 रोजी अटक करण्यात आली होती. तेंव्हापासून सर्व आरोपी हे अदयापर्यंत न्यायालयीन कोठडीतच (जेल मध्ये ) होते. 1) पवन उर्फ भुरा रामदास आर्य, वय 38 वर्षे, – 07 वर्षे कारावास व 2000 रु. दंड 2) मनोजकुमार ठाकूरदास आर्य, वय 32 वर्षे – 05 वर्षे कारावास व 2000 रु. दंड 3) देवेंद्र उर्फ राज रामलाल गुर्जर वय 37 वर्षे, – 05 वर्षे कारावास व 2000 रु. दंड 4) दिपेंद्रसिंग उर्फ चिंटू विजयसिंग राठोर, वय 41 वर्षे –(सोनार) 07 वर्षे कारावास व 5000 रु. दंड सर्व रा. इंदौर मध्यप्रदेश.

सदर आरोपींविरुध्द स्थानिक गुन्हे शाखा सोलापूर ग्रामीण चे पोलीस उपनिरीक्षक शैलेश खेडकर यांनी सबळ पुरावा गोळाकरुन दोषारोपपत्र न्यायालयात सादर करण्यात आले होते. त्यावेळी वरील आरोपींकडून एकूण 07 घरफोडी चोरीच्या गुन्हयांची उकल करण्यात आली होती.

सदरची कामगिरी पोलीस निरीक्षक सुहास जगताप, पोलीस उपनिरीक्षक शैलेश खेडकर व त्यांचे पथकातील सफौ/ ख्वाजा मुजावर, नारायण गोलेकर, धनाजी गाडे, मोहन मनसावाले, प्रकाश कारटकर, अक्षय डोंगरे, अक्षय दळवी, अनिस शेख, धनराज गायकवाड व चालक समीर शेख सर्व नेमणूक स्थानिक गुन्हे शाखा सोलापूर ग्रामीण, अमोल माने बार्शी शहर पोलीस ठाणे व सरकारी अभियोक्ता दिनेश देशमुख, कोर्ट पैरवी पोसई संजय कपडेकर व पोकॉ / गणेश ताकभाते यांनी बजावली.

# प्रधानमंत्री पिक विमा योजना सोलापूर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** प्रधानमंत्री पिक विमा योजना 2016 पासून राज्यात व सोलापूर जिल्ह्यात लागू करण्यात आली आहे. या योजनेत सहभागी शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्ती, कीड व रोगासारख्या अकल्पित प्रतिकूल परिस्थितीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास विमा संरक्षण देण्यात येते. प्रधानमंत्री पिक विमा योजनेत जोखमीच्या पाच बाबीचा समावेश आहे. हवामान घटकाच्या प्रतिकूल परिस्थितीमुळे पिकाची पेरणी अथवा लावणी न झाल्यामुळे होणारे नुकसान, हंगामातील प्रतिकूल परिस्थितीमुळे पिकाचे होणारे नुकसान, पीक पेरणी पासून काढणी पर्यंत च्या कालावधीत पिकाच्या उत्पन्नात येणारी घट या जोखमीच्या बाबी सर्व समावेशक असून यासाठी कोणतीही पूर्व सूचना देण्याची आवश्यकता नाही. स्थानिक नैसर्गिक आपती मुळे होणारे नुकसान व काढणी पश्चात नुकसान या जोखमीच्या बाबी करिता शेतकऱ्यांकडून पूर्व सूचना दिली जाते व वैयक्तिक स्तरावर विमा कंपनी प्रतिनिधी कडून पंचनामे करून नुकसान ठरवले होते.

खरीप व रब्बी हंगाम 2023 मध्ये वर्षभरात सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडून एकूण 152775 पीक नुकसानीच्या पूर्वसूचना कंपनीकडे देण्यात आल्या त्यापैकी विविध कारणांमुळे 120710 पूर्वसूचना नाकारून कंपनीने शेतकऱ्यांना विमा नामंजूर केला. यामुळे जिल्ह्यातील बऱ्याच शेतकऱ्यांनी कृषी विभाग व महसूल विभागाकडे तक्रार केली. जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक 22 ऑगस्ट 2024 व 28 जानेवारी 2025 रोजी जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीमध्ये तक्रारींची दखल घेऊन सदरील पीक नुकसानीच्या पूर्वसूचना स्वीकृत करून शेतकऱ्यांना पिक विमा देण्याबाबत ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी या विमा कंपनीस आदेश दिले आहेत. या आदेशाप्रमाणे विमा कंपनीने केलेल्या परिगणनेनुसार 63000 शेतकऱ्यांचे अंदाजित 75.50 कोटी रुपये असून याबाबत कंपनी राज्यस्तरावर अपीलात गेली आहे.

शेतकऱ्यांकडून देण्यात येणाऱ्या पिक नुकसानीच्या पूर्व सूचना बाबत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी वारंवार याबाबत आढावा घेवून, परिपत्रक काढून सीएससी केंद्र चालकांचे प्रशिक्षण, व्हाट्सअप ग्रुप द्वारे शेतकऱ्यांमध्ये जनजागृती, याम सुरक्षा यंत्राचा वापर, इत्यादी द्वारे पिक नुकसानीच्या पूर्व सूचना नाकारण्यात चे प्रमाण कमी करण्यासाठी सूचना दिलेल्या होत्या. विमा कंपनीस वेळोवेळी दिलेल्या सूचना, आदेश परिपत्रके, प्रशिक्षणे यामुळे खरीप 2024 मध्ये पीक नुकसानीच्या पूर्वसूचना नाकारण्याचे प्रमाण कमी झाले आहे. खरीप 2024 मध्ये शेतकऱ्यांकडून दिलेल्या 306000 पूर्वसूचनापैकी 227000 (74%) पूर्व सूचनांचा स्वीकार करून विमा कंपनी द्वारे 278.7 कोटी रुपयांचा विमा मंजूर झाला आहे.

खरीप 2024 मध्ये पीक नुकसानीचे पंचनामे व अहवाल तयार करण्यामध्ये अनियमितता असल्यामुळे विमा कंपनीकडे वारंवार स्थळ पंचनामा प्रत व छायाचित्रे याची मागणी वारंवार जिल्हास्तरीय आढावा बैठकीत करण्यात आलेली आहे परंतु अद्याप पर्यंत कंपनीकडून या बाबींची पूर्तता करण्यात आली नाही. दिनांक 16 मे 2025 रोजी झालेल्या खरीप हंगाम पूर्व बैठकीमध्ये पुढील आठ दिवसात विमा कंपनीने स्थळ पंचनामा प्रति, विमा वाटप याद्या, रिजेक्शन याद्या व छायाचित्रे द्यावेत अन्यथा पिक विमा कंपनीविरुद्ध (Oriental Insurance) गुन्हा दाखल करण्यातचे निर्देश मा. पालकमंत्री /मा. जिल्हाधिकारी यांनी दिले आहेत. अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी दिली.

# रेश्मा राऊत यांचे माढा तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन



**माढा (कटूसत्य वृत्त):-** माढा तालुक्यातील जाधववाडी (मो)गावातील गट नं.१४० च्या अनुषंगाने खरेदीखत फेरफार प्रमाणे महसूल अधिकारी यांनी नोंदणी न घेतल्याच्या निषेधार्थ रेश्मा प्रशांत राऊत यांनी माढा तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन सुरु केले आहे. सोलापूरचे जिल्हाधिकारी,व पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी कार्यालयास दिलेल्या लेखी निवेदनात राऊत यांनी म्हटले आहे की,गावकामगार तलाठी यांनी न्यायालयीन निकालाचा अवमान केला असुन कायद्याचा भंग केल्याने व ७ /12 हक्कपत्रकी नोंद न केल्याने जाधववाडी(मो) ता.माढा येथील संबधित गावकामगार तलाठी व मंडल अधिकारी यांच्यावर चौकशी करुन तात्काळ कार्यवाही करण्यात यावी व ७ /12 उताऱ्यावर फेरफार प्रमाणे नोंद ओढण्याची मागणी आंदोलक रेश्मा राऊत यांनी केली असून मागणी मान्य न केल्यास आत्मदहन करण्याचा इशारा राऊत यांनी दिला आहे.

# एचएसआरपी प्लेट बाबत तक्रारी संबंधित सेवापुरवठा धारकांच्या पोर्टलवर नोंदवावी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शासनाने 01 एप्रिल 2019 पासून उत्पादित होणाऱ्या सर्व नवीन वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट बसविण्याची तरतूद करण्यात आली असून हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट बसविण्या संदर्भात काही तक्रार असल्यास संबंधीत सेवापुरवठा धारकांच्या पोर्टलवर तक्रार सादर करण्याचे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

**तक्रार नोंदविण्यासाठी माहिती खालीलप्रमाणे –**

1. Agency Name: M/s Real Mazon India Ltd., 2. Office Customer care No.: +91-120-6457502, +91-102-6457503, 3. Employee Name: Atul Ghadge Mob. No. 7506993630, 4. Email Id:- realmazonmhhsrp@outlook.com , atulrmhsrp@gmail.com

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

**-: संपर्क :-**

**8083608083**
**9922646566**
**8698732109**

(सरकार मान्य)

**अथर्व पेस्ट कंट्रोल**

An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**

**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**

**9822964815**
**9421984815**

**झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण**


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# शालेय विद्यार्थ्यांच्या दाखले वाटपसाठी तालुक्यात विशेष शिबीर

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** दहावी व बारावी शालांत परीक्षेचे निकाल लागले असून, विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वर्षासाठी आवश्यक असलेले दाखले सुलभ व सहज उपलब्ध व्हावेत तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक गरजांची पुर्तता व्हावी व विद्यार्थ्यांना आपले दाखले स्थानिक स्थरावर मिळावे या उद्देशाने तहसिल कार्यालय, पंढरपूर यांच्या मार्फत पंढरपूर तालुक्यात मंडळ स्थरावर श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानातंर्गत विशेष शिबीर आयोजित करण्यात आल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवेशासाठी आवश्यक आवश्यक दाखले (उदा. उत्पन्न, वय व अधिवास, जातीचा दाखला, नॉन क्रिमीलेयर दाखला व इतर दाखले तसेच नागरिकांना रहिवाशी, उत्पन्न व जातीचे दाखले देण्यासाठी तालुक्यात दि.23 मे 2025 रोजी करकंब, खर्डी, चळे व भंडीशेगांव व दि. 27 मे 2025 रोजी पंढरपूर, तुंगत व कासेगांव तसेच दि.30 मे 2025 रोजी रोपळे,पुळूज, पटवर्धन कुरोली, भाळवणी या महसूल मंडळाच्या ठिकाणी मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांच्या कार्यालयात विशेष शिबीर आयोजित करण्यात आले आहे. सदर शिबीरासाठी मंडळ निहाय महा ई सेवा केंद्र चालक यांची नेमूणक करण्यात आली असून, मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांनी शालेय विदयार्थी व नागरिकांनी गांव निहाय महा ई सेवा केंद्र चालक यांचेशी समन्वय साधून, शिबीर आयोजित करुन सदर शिबीरामध्ये जास्तीत संख्येने दाखले देण्याचे कामकाज करावे तसेच जास्तीत संख्येने उपस्थित राहून दाखले प्राप्त करुन घ्यावेत.असे आवाहन तहसिलदार लंगुटे यांनी केले आहे.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) सोलापूर जिल्ह्यातील मूळचे अकलुजचे असलेले नेते
२) फायदा
३) इतिहासकालीन राजसभेची जागा, बाब
४) मोदींचा पक्ष
५) मनसे प्रमुख
६) चुलत्यांना या नावाने संबोधतात
७) राजकारणात एंट्री करणारा एक दाक्षिणात्य अभिनेता
१४) अवजड १५) सीतापती
१८) एक म्हण - अति तेथे **
२०) नगरपालिका प्रमुख
२२) यश अपयश
२४) एबीसीडीतील शेवटून दुसरे अक्षर २५) युध्द मैदान, वाळवंट
२८) परीक्षेत उत्तीर्ण होणे
३१) घर बांधकामासाठी मातीपासून बनवितात ती
३२) कोकणातील एक तालुका
३३) एक वजनमाप ३५) भिंतीला पडलेली भेग (हिंदीत)
३७) जादू, किमया
३८) शक्ती, उर्जा ३९) सामान्य
४०) शिवसेनेचे मुखपत्र ४१) लय, रिदम ४३) आशिर्वाद, नवरा मुलगा
४५) एक म्हण - दाम करी **

**आडवे शब्द :** १) आमदारांचे सभागृह
५) पॉलिटिक्स
८) वडील (इंग्रजीत)
९) शर्टला बटण अडकविण्यासाठीची खाच
१०) सफलता
११) मदनाची पत्नी
१२) मुंबईलगतचा एक जिल्हा
१३) बँकांची कोट्यावधीची कर्जे बुडवून फरार झालेला - *** मोदी
१६) कविता बनविताना जुळविला जाणारा शब्दांलकार १७) एक साबण १९) पाऊस (इंग्रजीत) २१) पाणी पिण्याची तीव्र इच्छा, तृष्णा २३) एक मौल्यवान रत्न २४) माकड २६) किल्ला २७) दार उलट लिहा २८) चप्पल (ग्रामीण भाषेत) २९) एक म्हण - हाजीर तो *** ३०) पंधरा + आठ ३२) संदेश देण्याचे साधन ३४) बसण्यासाठी आयताकृती लाकडापासून बनविलेला ३५) सावध ३६) चिन्हे ३८) स्वयंप्रकाशित ग्रह, स्टार ३९) ब्रेड (मराठीत) ४०) प. महाराष्ट्रातील क्रांतीकारी जिल्हा ४२) पटकन, लगेच ४४) पाठीचा कणा यापासून बनतो ४६) मलम उलट लिहा ४७) दात ४८) एक म्हण - ** सोडून संन्याशाला फाशी ४९) तीस दिवसांचा माह

## सुडोकु - 254

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 4 | 6 | 7 | |
| | | 9 | 2 | | | 8 | | 1 |
| | | 7 | 6 | 1 | 3 | | 4 | 9 |
| | 5 | | 1 | | | 2 | 8 | 4 |
| | 1 | | | | | 3 | 9 | 6 |
| 4 | 9 | 6 | 8 | | | | 5 | |
| 3 | | | | 6 | 1 | | 2 | |
| | 8 | 5 | 4 | | | | 6 | |
| 9 | | | | 7 | 8 | | | |

# सोलापूर तालुका पोलीस ठाण्यात रक्तदान शिबिर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर तालुका,पोलीस ठाणे येथे रक्तदान शिबीरीचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र शासनाच्या 100 दिवसीय सुशासन मिशन " च्या अनुषंगाने सोलापूर तालुका, पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी राहुल देशपांडे यांनी अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण, प्रितम यावलकर, अपर पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण व मा.संकेत देवळेकर, उपविभागीय पोलीस अधिकारी सोलापूर ग्रामीण उपविभाग सोलापूर यांचे मार्गदर्शनाखाली दिनांक 13.05.2025 रोजी सोलापूर तालुका, पोलीस ठाणेस रक्तदान शिबीराचे आयोजन केले होते.

सदर रक्तदान शिबीरा करीता सोलापूर तालुका, पोलीस ठाणेच्या कार्यक्षेत्रातील गावातील पोलीस पाटील यांचे करवी पोलीस निरीक्षक राहुल देशपांडे यांनी नागरिकांना आवाहन करण्यात आले होते.



रक्तदानामुळे गरजु रूग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध होऊन त्याचे प्राण वाचावावे, रक्तदाना बाबत नागरिकां मध्ये जनजागृती व्हावी, सामाजिक बांधिलकी जपावी रक्ताचा तुटवडा भरून काढावा. तसेच रक्तदानाच्या वेळेस रक्तदान्याची आरोग्य तपासणी केली जाते. त्यामुळे स्वतःच्या आरोग्याची माहिती मिळते या उद्देशाने रक्तदान शिबीराचे श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रूग्णालय, सोलापूर याचेकरवी आयोजन केले होते.

आयोजित करण्यात आलेल्या रक्तदाना शिबीरा मध्ये राहुल देशपांडे, पोलीस निरीक्षक यांनी स्वतःहा सहभाग नोंदवुन रक्तदान केले आहे. तसेच पोलीस ठाणे कडील सहायक पोलीस निरीक्षक सोमनाथ कदम व पोलीस अंमलदार व नागरिकांनी रक्तदान केले आहे.

अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांचे संकल्पनेतुन सोलापूर ग्रामीणच्या कार्यक्षेत्रात " मिशन विकसित गाव " ही संकल्पना राबविण्यात येणार आहे.

प्रत्येक गावा गावातील जमीनीची पाण्याची पातळी वाढविणे करीता शेतक-यांना प्रबोधन करणे, तलावातील पाण्याची पातळी वाढविणे करीता तलावातील गाळ काढणे या करीता तहसील कार्यालयाकडुन कायदेशीर प्रक्रिया पुर्ण करणे, उत्तम शेतीचा विकास साधता येणे करीता कृषी विभागाच्या मदतीने शेततळे योजना राबविणे, गावातील ग्रामपंचायत शाळा मध्ये सौर उजेर्चा वापर करणे, मधुमक्षिका पालन करणे, गावा मध्ये हरीत क्रांती घडवण्याठी व पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी जास्तीत जास्त वृक्षारोपण करणेचा उद्देश आहे.

अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली सोलापूर तालुका, पोलीस ठाणेच्या कार्यक्षेत्रातील मौजे हिरज गावा मध्ये 5 जलतारा खड्डे घेण्यात आले आहेत. सपोनि/मनोज अभंग यांनी पोलीस अंमलदार यांचेसह मौजे कुरूल येथे 1 जलतारा खड्डा घेण्यात आला आहे. यापुढे कार्यक्षेत्रातील गावामध्ये "मिशन विकसित गाव" ही संकल्पना राबविण्यात येणार आहे.

# नर्सिंग कोर्सच्या नावे 400 विद्यार्थ्यांची फसवणूक केल्याचा आरोप

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नर्सिंग कोर्सला ॲडमिशन देऊन प्रमाणपत्र घेऊन देतो म्हणून बोगस परीक्षा घेतली. सुमारे 400 विद्यार्थ्यांची फसवणूक करण्यात आली असल्याचा आरोप करत याप्रकरणी संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी श्रमिक विकास संघटनचे जिल्हाध्यक्ष अशोक होटकर यांनी पत्रकार परिषदेत केली आहे.

नर्सिंग (जीएनएम) कोर्सला ॲडमिशनची जाहिरात केली. प्रमाणपत्र घेऊन देतो म्हणून संबंधित संस्था चालकांनी प्रत्येक विद्यार्थ्याकडून 50 हजार ते साठ हजार रुपये घेतले. त्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांना बिदर व गुलबर्गा येथे घेऊन गेले. तेथे परीक्षा घेतली. परीक्षा झाल्यानंतर लगेच हॉल तिकीट काढून घेतले. त्यानंतर गुणपत्रिकेची मागणी केल्यानंतर ती परीक्षा बोगस असल्याचे संबंधित विद्यार्थ्यांना समजले. संस्थाचालकांच्या पत्त्यावर गेले असता त्या ठिकाणी त्या राहत नसल्याचे समजले. अनेक दिवस त्यांचा शोध घेतला असता त्या संपर्कात आल्या नाहीत. दरम्यान, त्यानंतर अखेर विद्यार्थ्यांनी व संघटनेने जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले. तसेच सोलापुरातील सदर बझार पोलीस स्टेशनमध्ये संस्थाचालकाविरुद्ध तक्रार अर्ज दिला आहे. या प्रकरणात पोलिसांनी जाब जबाब नोंदवले आहेत. याप्रकरणी पोलिसांनी सखोल चौकशी करून संबंधितांवर गुन्हा दाखल करावा अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा संघटनेचे जिल्हाध्यक्ष अशोक होटकर यांनी दिला आहे.

या पत्रकार परिषदेस राजनंदिनी कुंभार, अक्षय कळसे, ज्योती शिंगे, करिष्मा मुल्ला, वैशाली कुंभार आदी उपस्थित होते.

# आ. डॉ.बाबासाहेब देशमुख यांची पंचायतराज समितीवर निवड

**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** काल विधान भवन, मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत सन २०२४-२५ या वर्षासाठीच्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या सर्व समित्यांची निवड करण्यात आली. राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, विधान सभेचे अध्यक्ष यांनी आमदार डॉ.भाई बाबासाहेब देशमुख यांची पंचायत राज समितीवर निवड करून त्यांना काम करण्याची मोठी संधी दिली ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था जसे की ग्रामपंचायती, पंचायत समिती आणि



जिल्हा परिषदा यांच्या कार्यप्रणाली, धोरणे आणि अंमलबजावणी यांचा अभ्यास करण्याची संधी यानिमित्ताने आमदार बाबासाहेब देशमुख यांना मिळणार आहे.

# सोलापूरातील पोरेडी नेत्रालयाचे शुक्रवारी उद्धाटन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** येथील रेल्वे लाईन, स्टेशन रोडवरील गुडलक जनरल स्टोअर्स जवळ पोरेडी नेत्रालय आणि लेसर सेंटरचे उद्घाटन शुक्रवार दि. 23 मे 2025 रोजी सायंकाळी 6 वाजता करण्यात येणार आहे, अशी माहिती नेत्ररोग तज्ञ डॉ. अमित पोरेडी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

उद्घाटनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून खा. प्रणिती शिंदे, आ. विजयकुमार देशमुख, आ. देवेंद्र कोठे, काँग्रेसचे शहर अध्यक्ष चेतन नरोटे, माजी नगरसेवक मनोज शेजवाल, अमर पाटील आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या नेत्रालयात संगणकृत नेत्र चाचणी, आधुनिक मोतीबिंदू शस्त्रक्रिया, लेन्स प्रत्यारोपण, कॉर्निया सर्व शस्त्रक्रिया, मेडिकल रेटिना, तिरळेपणाचे उपचार, मधुमेह व उच्च रक्तदाब रेटिनोपॅथी उपचार यासह विविध उपचार उपलब्ध आहेत. या समारंभास सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. अमित पोरेडी, डॉ. स्नेहल पोरेडी, डॉ. सुभाष पोरेडी, डॉ. विजयालक्ष्मी पोरेडी यांनी केले आहे.

# टेंभुर्णीत मान्सूनपूर्व पावसाची विजेच्या कडकडासह जोरदार हजेरी

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** टेंभुर्णी येथे मंगळवार दिनांक 20 मे रोजी सायंकाळी चार वाजल्यापासून मान्सूनपूर्व पावसाची जोरदार वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली असून आज सकाळपासूनच हवेत आद्रता वाढल्याने घामाच्या धारा लागल्याने नागरिक हायरान झाले होते.



या पावसाने ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. कारण बऱ्याच ठिकाणी ऊस हा पाणी देऊन हे अति उष्णतेमुळे उसाचे पोगे जळालेले दिसून येत होते ग्रामीण भागातील विहिरीची पाणी पातळी खूपच खोलवर गेली होती. काही ठिकाणी विहिरीचे पाणी हे एक दोन तासावरच आली होते. त्याचा उपयोग शेतकरी जनावरे सांभाळण्यासाठी पाण्याची सोय करून ठेवत होता. या चार दिवसापासून सुरू झालेल्या पावसाने काही भागात कमी पाऊस तर काही भागात जोरदार पाऊस असे प्रमाण सुरू होते. या पावसामुळे पीक उत्पादक शेतकरी हा सुखावला आहे.

गेल्या आठवड्यामध्ये सोलापूर जिल्ह्याचे तापमान हे 45 अंशावर गेले होते. हवेमध्ये झाल्यामुळे चार दिवसापासून तापमान 35 ते 36 अंश डिग्री सेल्सिअस वर आल्याचे दिसून येत आहे. तापमानात कमालीचा फरक जाणवल्यामुळे आजारी पडण्याचे प्रमाण किती जास्त असल्याचे दिसून येत आहे. मात्र आज झालेल्या टेंभुर्णी परिसरात वरवडे, सापटणे टें, वेणेगाव, अकोले बु!, चव्हाणवाडी टें, बेंबळे, मिटकलवाडी, तांबवे, कन्हेरगाव, दहिवली, शिराळा, आढेगाव, भिमानगर, रांजणी, आलेगाव, टाकळी, चांदज, वडोली व टेंभुर्णी शहरात पावसामुळे उष्णता बऱ्यापैकी कमी होऊन शेतकरी वर्ग सुखावला असून लवकरच यावर्षी शेतकरी मशागत करेल कारण मान्सून पूर्व अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचा काही ठिकाणी नुकसान झाले आहे तर काही ठिकाणी फायदा झाला आहे.

# सोलापूरच्या उद्योग वाढीसाठी आ.देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली शिष्टमंडळाची दुबईला भेट

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर सोशल फाउंडेशन आणि उद्योग फाउंडेशन सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने मा. आ. सुभाष देशमुख यांच्या नेतृत्वाखाली विविध क्षेत्रातील उद्योजकांचे एक आंतरराष्ट्रीय शिष्टमंडळ दुबई दौऱ्यावर गेले होते. सोलापूर जिल्ह्यातील उत्पादनांना दुबई येथील बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न या माध्यमातून झालेले आहे.

आमदार सुभाष देशमुख म्हणजे एक विकासाभिमुख नेतृत्व आहे. त्यांच्यामुळेच विविध क्षेत्रातील उद्योजक एकत्र येऊन एक शिष्टमंडळ तयार करून दुबईला भेट देणे शक्य झाले आहे. यामुळे युवा उद्योजकांना आंतरराष्ट्रीय मार्केटही उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सहकार्य होणार आहे.काही उद्योजक आंतरराष्ट्रीय व्यापार करण्यास सक्षम होणार आहेत. याचे श्रेय केवळ देशमुख यांना जाईल असे मत शिष्टमंडळातील प्रतिनिधींनी व्यक्त केले आहे.

यातील काही उद्योजक कधीच भारताबाहेर गेलेले नव्हते.त्यांना दुबई भेटी दरम्यान एक चांगला अनुभव घेता आला. महाराष्ट्रातील हे असे एकमेव उदाहरण असेल जे सोलापुरातील उद्योग वाढीसाठी शिष्टमंडळ तयार करून दुबईला घेऊन जाणारे पहिले नेतृत्व असलेले राजकारणी मा. आ. सुभाष देशमुख असतील. ज्यांनी युनिफॉर्म गारमेंट, चादर, टॉवेल, आयटी क्षेत्र, सायबर सिक्युरिटी, कृषी उत्पादन अशा विविध क्षेत्रातील उद्योग प्रतिनिधीची एक उच्चस्तरीय शिष्टमंडळ दुबईला नेले.



## दुबई येथील विद्यालयाचे कार्यकारी संचालक आनंद सूर्यवंशी आणि युनिफॉर्म गारमेंट वर चर्चा

दुबई शहरात एकूण 250 पेक्षा जास्त महाविद्यालये असून यातील विद्यार्थी यांच्या गणवेशासाठी सोलापूरचे युनिफॉर्म कसे विकत घेता येईल यावर सविस्तर चर्चा झाली. युनिफॉर्म गारमेंट यशस्वीरित्या सर्व शाळेत पोहोचण्यासाठी त्यांनी सामूहिक प्रयत्न करू असे आश्वासन दिले. तसेच सोलापूरच्या बॅग उत्पादकांनी नाविन्यपूर्ण पॅकेजिंग सोल्युशन देखील यावेळी सादर केले या उत्पादनांच्या गुणवत्ता व पारंपारिकतेचे कौतुक त्यांनी केले त्यांच्या खरेदी व्यवस्थापन टीम सोबत देखील यावेळी चर्चा झाली.

## शारजाह येथील रिसर्च टेक्नॉलॉजी अँड इनोव्हेशन पार्क

आमदार सुभाष देशमुख यांच्या नेतृत्वाखाली दुबईतील शारजा येथे शारजाह रीसर्च टेक्नॉलॉजी अँड इनोव्हेशन पार्कला भेट देण्यात आले या दौऱ्यात गव्हर्नमेंट संशोधन आणि आपल्या सोलापूर जिल्ह्यासाठी आंतरराष्ट्रीय साकार्याच्या विविध संधीचा अभ्यास करण्यात आला.

यावेळी संस्थेमधील वरिष्ठ अधिकाऱ्यासह दुबई स्थित उद्योजकासोबत व्यापार गुंतवणूक व स्टार्टअप साठी सरकारच्या संधीवर महत्त्वपूर्ण चर्चा करण्यात आली.

## युनिफॉर्म उत्पादनात उल्लेखनीय कार्य करणारे मॅथ्यू सुभाष

दुबई स्थित डिझाईन टॅक्स ही अग्रगण्य कंपनी युनिफॉर्म उत्पादन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत असून विविध उद्योगासाठी दर्जेदार व व्यावसायिक युनिफॉर्म तयार करण्याचा त्यांना विशेष अनुभव आहे आणि डिझाईन टॅक्स ग्रुपचे चेअरमन म्हणून श्री मृत्यू सुभाष हे काम पाहतात . त्यांची भेट घेण्यात आली. आणि युनिफॉर्म गारमेंट उद्योग वाढी संदर्भात सकारात्मक चर्चा झाली.

या शिष्टमंडळाच्या माध्यमातून दुबईतील अनेक उद्योजकांच्या प्रमुखांची भेट झाली. जवळजवळ 30 ते 32 उद्योजकांची सकारात्मक चर्चा झाली. डे टू डे स्टोअर्स, फ्लिपकार्ट, हायपर मार्केट, चिटग्राम फूड मार्केट, इत्यादी अशा वेगवेगळ्या मोठमोठ्या उद्योजकांच्या प्रमुखांशी चर्चा अगदी सकारात्मक झालेली असून उद्योग वाढीसाठी हे खूप महत्त्वपूर्ण आहे. या सर्वांचे संपलींग करून दुबईला निर्यात करण्यासंदर्भात देखील सकारात्मक चर्चा झाली. या शिष्टमंडळाच्या माध्यमातून सोलापूर दुबई बिजनेस फोरम तयार करण्याचे ठरले. ज्याच्या माध्यमातून कोणत्याही उद्योजकाला सोलापुरातून दुबईला जायचं असेल तर त्याला लागणारी काही मदत असेल तर हे फोरम सर्वतोपरी मदत करेल.

### सेक्युरिटी बिझनेस हेड संतोष कोरट दुबई

दुबई भेटी दरम्यान अनेक मान्यवरांची भेट झाली दरम्यान आय बी एम अॅक्रॉस गुल्फ आफ्रिका अँड इजिप्तचे सेक्युरिटी बिझनेस हेड संतोष कोरट यांच्याशी चर्चा झाली की सोलापूर येथे ऐतिक क्षेत्रात कशा पद्धतीने काम करतायेत सायबर सिक्युरिटी मध्ये सोलापूरचे आयटी हब कसे निर्माण करता येईल यावर सविस्तर चर्चा झाली उद्योग वाढीसाठी सोलापूर दुबई फोरम तयार करण्याचे ठरले.

### कृषी उत्पादनांना बाजारपेठ जितेन दमानिया दुबई

दुबई येथील जुई केमकर व जितेंद्रमानिया हे फूड सेक्टर मध्ये अत्यंत प्रभावीपणे काम करत असून सोलापूरच्या कृषी उत्पादनांना मोठी बाजारपेठ मिळवण्यासाठी यावेळी चर्चा सकारात्मक झाली. उद्योजकांनी सोलापूरच्या उत्पादनांचे सॅम्पल यांना दाखवले. या दोघांनी कृषी उत्पादनांना मोठे बाजारपेठ मिळवून देण्याची बाही दिली.

### दुबई येथील जागतिक पातळीवरील 'टेक्समास' संस्थेला भेट

सोलापूरच्या उच्चस्तरीय प्रतिनिधी मंडळांनी दुबई येथील टॅक्स स्टाईल सिटीतील टेक्समास टेक्स्टाईल मर्चट्स ग्रुपला भेट दिली. टेक्समो से भारत चीन आणि युरोप यासारख्या देशाशी आयात निर्यात संबंध अगदी कनिष्ठ आहेत. टेक्समास सचिव सचू मानवाणी, सहसचिव किशोर सलवाणी या मान्यवरांनी सोलापूरच्या उद्योग जगांशी दीर्घकालीन भागीदारी सकारात्मक प्रतिसाद दिला.

### युनिफॉर्म गारमेंट मॅन्युफॅक्चर

ही भेट दुबई आणि सोलापूर मधील व्यापार सहकार्याचे नवे द्वार खुले करणारी असून दोन्ही बाजूंना वस्त्र उद्योगातील निर्यात गुंतवणूक आणि कौशल्य विनिमयाच्या नव्या संधी देणारी ठरणार आहे सोबतच बैठकीला युनिफॉर्म व गारमेंट मॅन्युफॅक्चरिंग हाफ म्हणून कसे विकसित करता येईल त्याच्या दिशा व शक्यता आणि धोरणात्मक भागीदारी यावरही सविस्तर चर्चा करण्यात आली. या भेटीदरम्यान गारमेंट उद्योजकाची गुणवत्ता उत्पादन क्षमता याची माहिती देखील देण्यात आली विशेष म्हणजे दुबईतील टॅक्सी ड्रायव्हरच्या गणवेशाचे उत्पादन सोलापूर मधीलच असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

### अबुधाबी येथील माननीय जितेंद्र वैद्य

इंडियन पीपल फोरम चे अध्यक्ष अबुधाबी येथील जितेंद्र वैद्य यांनी या शिष्टमंडळाची सदिच्छा भेट घेतली त्यांनी दुबई येथील नागरिकांचे संघटन करणे त्यांना सर्वतोपरी मदत करण्याचे काम करतात सोलापूरच्या व्यवसायिकांना या माध्यमातून उद्योजकांचे शिष्टमंडळ वेळोवेळी दुबईला येऊन भेट देणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. यामुळे दुबई येथील वेगवेगळ्या क्षेत्रात असणाऱ्या उद्योगांच्या संधी कशा उपलब्ध होतील ते पाहूयात अशा आश्वासन दिले.

### सोलापूर साठी डिझाईन ऑटोमेशन क्षेत्रात तरुणांना संधी : सागर कुलकर्णी

दुबई स्थित सागर कुलकर्णी यांनी डिझाईन ऑटोमेशन क्षेत्रात तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्याची ग्वाही दिली त्यातच प्रमाणे ते काही दिवसातच सोलापूर दौरा करून रोजगार उपलब्ध करून देणार आहेत. त्यामुळे सोलापूरच्या कौशल्याला जगभरात स्थान मिळण्यासाठी संधी मिळणार आहे. सागर कुलकर्णी हे बांधकाम ऑटोमेशन डिझाईन व्यवसायत मोठ्या प्रमाणात दुबई सारख्या विकसित देशात आपला ठसा उमटाविलेला आहे.

### अबुधाबी येथील बीएपीएस मंदिराला भेट

आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेबांच्या दूरदृष्टीचे फलित म्हणजे हे बीएपीएस मंदिर होय. मंदिराचे निर्माण भारतीय संस्कृती आणि अध्यात्माचा गौरव जागतिक पातळीवर नेण्यासाठी त्यांनी प्रयत्न केला. सर्व भक्तांना प्रेम शांतता आणि एकात्मतेचा संदेश देणारे अबू दाबी येथील हे मंदिर निश्चितच एक प्रेरणादायी ठिकाण आहे.

अबुधाबी येथील हे पवित्र बीएपीएस स्वामीनारायण मंदिर म्हणजे भव्य भारतीय संस्कृती स्थापत्येकाला आणि अध्यात्मताचे अद्वितीय संगम आहे मंदिराच्या परिसरात पाऊल ठेवताच एक विलक्षण अध्यात्मिक शांतता अनुभवायला मिळाली असल्याचे सर्व प्रतिनिधींनी आपले मत व्यक्त केले.

### दुबईतील सर्व सोलापूरकर एकत्रित

सोलापूरच्या आणि महाराष्ट्राच्या विविध उद्योग क्षेत्रात यशस्वी ठरलेल्या मान्यवरांच्या स्नेहसंवाद कार्यक्रमात मा. आ. सुभाष देशमुख यांनी मार्गदर्शन केले. आपण सोलापूरच्या मातीतून उभे राहून जागतिक पातळीवर उद्योग क्षेत्रात आपला ठसा उमटविलेला आहे तेव्हा आता सोलापूरच्या वैभवासाठी एकत्र येण्याची व त्याला विकासासाठी हातभार लावण्याची आता गरज निर्माण झाली आहे भावना त्यांनी व्यक्त केली. चला आपण सर्व एकत्र येऊ आणि सर्व उद्योग पुढे घेऊन जाऊ आणि सोलापूरच्या स्वप्न साकार करूया असे आवाहन देशमुख यांनी केले.

### अल अदिल ट्रेडिंगचे : धनंजय दातार

दुबई स्थित धनंजय दातार हे अल्लादिन ट्रेडिंगचे चेअरमन आहेत त्यांनी सोलापुरातील खाद्यपदार्थ आणि इतर पारंपारिक व दजेर्दार कृषी उत्पादने यावर चर्चा केली आणि त्यांनी ही दजेर्दार उत्पादने विकत घेण्याचे आश्वासन दिले. अल्लादिल ट्रेडिंग हे मध्यपूवेर्तील मसाले व अन्नधान्याच्या क्षेत्रातील अग्रगण्य वितरक आहेत.

दातार यांनी सोलापूरच्या सांस्कृतिक वारशाचे व उद्योजकीय क्षमतेचे विशेष कौतुक केले. ही भेट स्थानिक उत्पादकासाठी निर्यात संधी निर्माण करणारी ठरली असून भारत व यूएई यांच्यातील व्यापार संबंध अधिक दृढ होणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# सिद्धेश्वर तलावाच्या पाण्याची गुणवत्ता वाढवण्यासाठी कृती आराखडा सादर करावा - जिल्हाधिकारी आशीर्वाद




**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** मागील दहा-पंधरा दिवसात सिद्धेश्वर तलावातील मासे व कासव यांचा काही कारणामुळे मृत्यू होत असल्याची बाब निर्देशनास आली. तलावातील पाण्याचा पीएच कमी झाल्याने पाण्यातील जीवांना ऑक्सिजनचा पुरवठा कमी झाल्याने त्यांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. तरी तलावातील पाण्याची शुद्धता व गुणवत्ता वाढवण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने एका एजन्सीची नियुक्ती करून कृती आराखडा सादर करावा व ते काम सुरू करण्याचे आदेश 15 जून 2025 पर्यंत द्यावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात सिद्धेश्वर तलावातील मासे व कासव यांच्या मृत्यूच्या कारणाच्या अनुषंगाने आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद बोलत होते. यावेळी सोलापूर महापालिकेचे आयुक्त सचिन ओंबासे, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, रवी पवार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मनोज ठाकरे, नगर अभियंता सारिका अंकुलवार, सार्वजनिक अभियंता वेंकटेश चोबे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की सार्वजनिक बांधकाम विभागाने पर्यटन विकास अंतर्गत सिद्धेश्वर तलावातील पाण्याची शुद्धता वाढवण्यासाठी एका खाजगी एजन्सीची नियुक्ती करावी. इरिएशन ट्रीटमेंट च्या माध्यमातून पाण्याची शुद्धता करून ऑक्सिजनचे प्रमाण वाढवावे ज्यामुळे मासे कासव व अन्य जलजीवांना धोका निर्माण होणार नाही. त्यासाठी एक कृती आराखडा सादर करून 15 जून 2025 पर्यंत त्याचे काम सुरू होईल याची खात्री करावी असेही त्यांनी सुचित केले.

प्रारंभी या बैठकीत मागील काही दिवसापासून शुद्धेश्वर तलावातील मासे व कासव मृत्यू होत असल्याची घटना निर्देशनास आली होती. त्यांच्या मृत्यूचे कारणांची चर्चा होऊन पाण्याची अमलता वाढल्याने मासे व कासवांना ऑक्सिजनचा पुरवठा कमी झाला व त्यामुळे त्यांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती बैठकीत देण्यात आली.

# मोहोळ मतदार संघातील प्रश्नावर आ. राजू खरे आक्रमक

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा नियोजन समितीची बैठक शुक्रवारी पालकमंत्री जयकुमार गोरे अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. या बैठकीत मोहोळ मतदार संघाचे आमदार राजू खरे यांनी आपल्या मतदार संघातील महत्वाचे प्रश्न आक्रमकतेने विविध मुद्देसह उपस्थित केले. या विविध प्रश्नांमध्ये शेतकऱ्यांच्या अतीशय महत्वाचे विषय चांगलेच लावून धरले होते.

या नियोजन समितीचे बैठकीत आ.खरे यांनी मोहोळ तालुक्यातील जामगाव बु., यावली, पोखरापूर. उत्तर सोलापूर तालुक्यातील वडाळा, सेवालाल नगर, रानमसले, गावामध्ये मोठया प्रमाणात पाणीटंचाई आहे. या गावात बोरवेल, किंवा टँकर त्वरीत देण्यात यावे. अशी मागणी केली.

या वरील मागणीची पालकमंञी यांनी दखल घेतं तात्काळ जिल्हाधिकारी यांना त्वरीत चौकशी करून कार्यवाही करण्याचे आदेशही दिलेआहेत.

जिल्हास्तरीय कृषी हंगाम सन- 2025 आढावा बैठकीत जिल्ह्यातील शेतकऱ्यांना चांगले



बियाणे व दर्जेदार खते देण्यात यावीत. अशा सुचना आमदार राजू खरे यांनी केल्या आहेत. जिल्हा नियोजन मधून शेतकऱ्यांना देण्यात येणारे विद्युत डिपीचा निधी वाढवून देण्यात यावा.

विमा कंपनीकडून नुकसान भरपाई चा निधी त्वरीत देण्यात यावी. असे शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नासाठी अग्रक्रम देण्यात आला.

यासह मतदार संघातील विकास कामे याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. शेतकऱ्यांचे हिताचे कामे करण्यात यावेत अशा सर्व प्रशासनाला सुचना देण्यात आल्या. या बैठकीसाठी जिल्हाधिकारी, महसूल प्रशासन, व पोलीस अधीक्षक सोलापूर, व मुख्य कार्यकारी आधिकारी जि.प. सोलापूर सर्व खातेप्रमुख उपस्थित होते.


**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**

**सार्वजनिक बांधकाम विभाग,सोलापूर,सात रस्ता,कारीगर पेट्रोल पंपासमोर, सोलापूर-४१३००३**

**ई-निविदा सुचना क्रमांक ५३ सन २०२४-२५ (ऑनलाईन)**

**(सोलापूर जिल्हयातीली मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त) (तिसरी वेळ निविदा सुचना)**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर-४१३००३ निविदा पत्रात नमुद केलेले पात्रतेचे निकष पुर्ण करीत व सा.बां.विभगाकडून नोंदणीकृत असलेल्या सोलापूर जिल्हयातीली मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त यांचेकडून खालील कामा करिता ''बी-१'' नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहोत. निविदा कागदोपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर, ४१३००३ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| | |
|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी | दि.२३/०५/२०२५ (वेळ सकाळी १०.०० वाजेपासून) ते दि.३०/०५/२०२५ (सायं. १८.१५ पर्यंत) |
| निविदा पूर्व बैठक | ---निरंक--- |
| तांत्रिक व आर्थिक निविदा सादर करणेचा अखेरचा दिनांक. | दि.३०/०५/२०२५ (सायं. १८.१५ पर्यंत) |
| मुळ दस्तऐवज सादर करण्याचा अंतिम दिनांक (निविदा :- शर्त ८.१) | ई-निविदा पोर्टलवर ''बीड लॉक'' झाल्यानंतर ७२ तासात ''हार्ड कॉपी १ प्रतीत कंत्राटदारांनी खालील कार्यालयामध्ये सादर करणे अनिवार्य आहे. १.मा.कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,सोलापूर |
| निविदा उघडण्याचा कालावधी ठिकाण व वेळ. | दि.०२/०६/२०२५ मा.कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,सोलापूर यांचे कार्यालयात सकाळी ११.०० वाजता. |

निविदा सुचनाबाबतची सविस्तर माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
१) www.mahapwd.gov.in २) www.mahatenders.gov.in (सदर निविदेसुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.) ३)कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर ४१३००३ कार्यालयात सुचना फलक

**सही/- (मनोज रा. ठाकरे)**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर**

जिमाका/सो/जाहि/२९/२०२५-२६